अस्सल सोलापुरी

सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | बुधवार, दि. १३ सप्टेंबर २०२३ | वर्ष : २१ वे | अंक : ३४५ वा किंमत : ५ रुपये | पाने ८

लंकेला नमवत भारतीय संघ आशिया कपच्या अंतिम फेरीत

कोलंबो : भरतीय संघाने श्रीलंकेवर विजय मिळवला आणि त्यासह त्यांनी आशिया कपच्या अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला आहे. भारताने प्रथम फलंदाजी करताना २१३ धावा केल्या होत्या. या आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १७२ धावांत आटोपला. या विजयासह भारताने अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. कुलदीप यादवने यावेळी चार विकेट्स येत विजयात पुन्हा मोलाचा वाटा उचलला.

भारताचे २१४ धावांचे आव्हान माफक वाटत होते. पण भारताच्या गोलंदाजांनी हे आव्हान श्रीलंकेसाठी कठीण करून ठेवले. कारण जसप्रीत बुमराने सुरुवातीला भेदक गोलंदाजी करत श्रीलंकेला एकामागून एक धक्के दिले. बुमराने प्रथम श्रीलंकेचा सलामीवीर पथुम निसांकाला सहा धावांवर बाद केले. त्यानंतर बुमराने भारताला सर्वात मोठी विकेट मिळवून दिली ती कुशल मेंडिसची. कारण मेंडिस सध्या चांगल्या फॉर्मात आहे आणि तो एकहाती सामना फिरवू शकतो. त्यामुळे त्याची विकेट भारतासाठी महत्वाची होती. बुमराने यावेळी मेंडिसला सूर्याकरवी झेल बाद केले आणि भारताला मोठे यश मिळवून दिले.

सरकारचा खासगीकरणाचा हेका
९ कंपन्यांना दिला भरतीचा ठेका

कमिशनमुळे सत्ताधारी आमदारांची होणार 'चांदी'

सुराज्य/विशेष प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या प्रशासकीय क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. महायुतीच्या सरकारने सरकारी, निमसरकारी, महामंडळे या ठिकाणी अधिकाऱ्यांसह इतर महत्त्वाची पदे कंत्राटी पद्धतीने भरण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी ९ कंपन्यांना पद भरतीचा ठेका दिला आहे. त्याबाबतचा शासन आदेश काढण्यात आला आहे. सरकारचे हे पाऊल म्हणजे खाजगीकरणाचाच हा डाव असल्याची ओरड सुरू झाली आहे. या निर्णयातून राज्यात नवे वादळ उठण्याची चिन्हे दिसत आहेत. एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी अशा भरती प्रक्रियेला कडाडून विरोध केला आहे. दरम्यान कोल्हापूरच्या दौऱ्यावर आल्यानंतर उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी एका निवेदनकर्त्याला झापले. राज्याचे वार्षिक बजेट साडेपाच ते सहा कोटींचे असून यापैकी २ लाख ४० हजार कोटींचा खर्च केवळ वेतनावर होतो. राज्याचा सारा महसूल वेतनावरच खर्च होईल. विकास कामांसाठी निधी आणायचा कोठून? आज तुम्हीच (निवेदनकर्ता) मुख्यमंत्री झाले तरी राज्याचे प्रश्न सुटू शकणार नाहीत, असा इशाराही त्यांनी दिला.

थेट सरकारी कर्मचारी भरतीला पर्याय म्हणून राज्य सरकारने कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या भरतीची कक्षा आणखी रूंदावली आहे. अधिकाऱ्यासह कार्यालयातील सर्वच महत्त्वाची पदे आता कंत्राटी असणार आहेत. त्यांच्या नियुक्तीसाठी सहा सप्टेंबर २०२३ रोजी नऊ कंपन्यांना ठेका देण्यात आला आहे. राज्यात आरक्षणाची लढाई जोर धरत असताना थेट आरक्षणाला काात्री लावण्यात आल्याची चर्चा सुरू झाली आहे.

हे अधिकारी नियुक्त करण्याचे सर्व अधिकार कंपन्यांना देण्यात आले आहेत. त्यांचा पगार निश्चित करण्यात आला असून तो सरकार देणार आहे. त्यातील पंधरा टक्के कमिशन कंपन्यांना मिळणार आहे.

सर्व शासकीय, निमशासकीय, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था या सर्व आस्थापना विभागात लागणारे कर्मचारी याच कंपन्याकडून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे सरकारी कार्यालयात आता अधिकारी ते शिपायापर्यंत सर्वच कंत्राटी पदे असणार आहेत.

सध्या शासकीय कर्मचार्यांच्या वेतनावर होणारा खर्च प्रचंड असून एका कर्मचाऱ्याच्या पगारात खासगी कंपनीचे तीन तीन कर्मचारी काम करु शकतात.

राज्याचे वार्षिक बजेट साडेपाच ते सहा कोटींचे असून यापैकी २ लाख ४० हजार कोटींचा खर्च केवळ वेतनावर होतो, असे म्हणत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महाराष्ट्रातील विविध पदाच्या शासकीय नोकर भरतीच्या परीक्षा या शासनाच्या वतीने भराव्यात या मागणीचे निवेदन देणाऱ्या निवेदनकर्त्याला सुनावले. कोल्हापूर दौऱ्यावर सभेसाठी जात असताना डेमोक्रेटिक पक्षाच्या शिष्टमंडळाने हे निवेदन पवार यांना दिले यावेळी पवारांनी हे मत व्यक्त केले.

या खाजगी कंपन्यांकडून अतिकुशल मनुष्यबळ या संवर्गात प्रोजेक्ट मॅनेजर, मॅनेजर, आयटी अधिकारी, वरिष्ठ अभियंता, कनिष्ठ अभियंता, माहिती अधिकारी अशी वेगवगेळ्या ७० प्रकारची हजारो पदं भरली जाणार आहेत. या पदांवरील व्यक्तींना महिना दीड लाख ते ऐंशी हजारांपर्यंत पगार देण्यात येणार आहे.

कुशल मनुष्यबळ या संवर्गात कायदा अधिकारी, शिक्षक सहाय्यक अधिकारी, लेखाधिकारी, सहाय्यक संशोधक यासारख्या पन्नास प्रकारची हजारो पदे भरली जाणार आहेत. या पदांवरील व्यक्तींना महिन्याला पंचेचाळीस हजरांपासून ते पंधरा हजारांपर्यंत पगार दिला जाणार आहे.

राज्य सरकारने माहिती अधिकाराअंतर्गत दिलेल्या माहितीनुसार राज्य सरकारच्या वेगवगेळ्या खात्यांमधील दोन लाख अकरा हजार पदे सध्या रिक्त आहेत. तर स्थानिक स्वराज्य संस्था, महामंडळे, निमशासकीय संस्था आणि आस्थापनांमधील मिळून अडीच लाख पदे सध्या रिक्त आहेत. ही सगळी पदे नऊ खाजगी कंपन्यांमार्फत भरली जाणार असतील तर आम्ही महिनोंमहिने अभ्यास करुन उपयोग काय असा सवाल एमपीएससीचे विद्यार्थी विचारत आहेत.

...या कंपन्यांना मिळाला भरतीचा ठेका

ॲक्सेंट टेक, सी.एम.एस.आयटी, सी.एस.सी.ई गव्हर्नन्स, इनोवेव आयटी, क्रिस्टल इंडग्रेटेड,एस-२ इन्फोटेक, सैनिक इंटेलिजन्स,सिंग इंटलिजन्स, उर्मिला इंटरनॅशनल.

आम्हालाही पटत नाही, पण...

राज्यातील शासकीय नोकरांचे पगार, भत्ते, महागाई वाढत आहेत. यामुळे जर सर्वच ठिकाणी शासकीय कर्मचारी नियुक्त केले तर तुम्ही मुख्यमंत्री झालात तरी राज्याचा सर्व महसूल केवळ पगारावर खर्च होईल. मग रस्ते व अन्य विकास कामासाठी निधी कुठला येणार? खासगी कंपन्याकडून मनुष्यबळ घेणे आम्हालाही पटत नाही. मात्र, उत्पन्न आणि खर्च याचा मेळ घालणे गरजेचे आहे. यामुळे सर्वच जागा भरणे कोणत्याही सरकारला आर्थिक स्थितीमुळे अशक्य आहे,असे वास्तव पवारांनी सांगितले.

उखळ कोणाचे पांढरे होणार?

या नऊ खाजगी कंपन्यांपैकी क्रिस्टल इंटिग्रेटेड सर्व्हिस लिमिटेड ही कंपनी भाजप आमदार प्रसाद लाड यांच्या मालकीची आहे. तर इतर कंपन्याही सत्ताधारी आमदारांच्या जवळच्या लोकांच्या मालकीच्या आहेत. सरकारचे पैसे वाचवण्यासाठी खाजगी कंपन्यांमार्फत नोकरभरती करणं आवश्यक असल्याचं एकीकडे राज्यकर्ते सांगत असताना दुसरीकडे त्यासाठीची कंत्राटं जवळच्या आमदारांना दिली जात असतील तर त्यातून कोणाचे पैसे वाचणार आहेत आणि कोणाचं उखळ पांढरं होणार आहे याचा अंदाज आताच लावला जात आहे.

निर्णयाचे फायदे

- सरकारी खर्चात वीस ते तीस टक्के घट
- पगार थेट बँकेत होणार जमा
- पगार निश्चित केल्याने कर्मचाऱ्यांचा होणार फायदा

विवाहितेचा जाळून खून; पतीसह सासू-सासऱ्याला जन्मठेप

सुराज्य/सोलापूर

हुंड्याच्या कारणावरून एका ३० वर्षीय विवाहितेचा जाळून खून केल्याच्या आरोपावरून मयताचा पती आणि सासू- सासऱ्याला जन्मठेप आणि प्रत्येकी ५ हजार रुपये दंड अशी शिक्षा जिल्हा व सत्रन्यायाधीश कविता शिरभाते यांनी मंगळवारी ठोठावली.ही घटना शिरापूर (ता.मोहोळ) येथे १ जून २०१४ रोजी सकाळच्या सुमारास घडली होती.

ज्योतिबा शिवाजी जाधव (वय ३६) त्याचे वडील शिवाजी रामचंद्र जाधव (वय ६५) आणि आई मालन शिवाजी जाधव (वय ६० सर्व रा.शिरापूर ता.मोहोळ) अशी शिक्षा झालेल्या आरोपींची नावे आहेत.

या खटल्याची पार्श्वभूमी अशी, मोहोळ परिसरात राहणाऱ्या धनश्री हिचा विवाह २०१३ साली जोतिबा शिवाजी जाधव (रा. शिरपूर) याच्यासोबत झाला होता. काही दिवस नीट नांदवल्यानंतर तिला हुंडा आणि प्रापंचिक कारणावरून सासरी छळ सुरू झाला. या संदर्भात तिच्या माहेरकडे लोकांनी पोलीस पाटलाकडे तक्रार नोंदवली होती. त्यानंतर नीट नांदवतो असे सांगितल्यामुळे धनश्री पुन्हा सासरी नांदण्यास आली होती.

सासरी नांदत असताना पुन्हा शारीरिक आणि मानसिक त्रास सुरू झाला होता. दिनांक १ जून २०१४ रोजी सकाळच्या सुमारास धनश्री जाधव हि घरात काम करीत होती. त्यावेळी तिघांनी मिळून तिला मारहाण केली. पती जोतिबा जाधव याने तिच्या अंगावर रॉकेल ओतले, तर सासू आणि सासरे यांनी तिच्या अंगावर पेटती काडी टाकली. आगीचा विळख्यात असताना तिने बचावासाठी आरडा ओरड केली.



मोहोळ तालुक्यातील शिरापूर येथील घटना

तेव्हा शेजारच्या लोकांनी आग शमवून याची माहिती विवाहितेच्या वडिलांना कळविली. तिचे वडील घटनास्थळी आले . त्यावेळी भाजलेली धनश्री ही एका चादरीत गुंडाळलेल्या अवस्थेत आढळली. वडिलांनी तिला त्वरित सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. उपचारा दरम्यान ती १४ जून २०१४ रोजी मयत झाली.

दरम्यान तिच्या मृत्यूपूर्व जवाबावरून मोहोळच्या पोलिसांनी मयत धनश्री हिचा पती आणि सासू- सासऱ्याविरुद्ध खून आणि मारहाणीचा गुन्हा दाखल केला होता. तत्कालीन सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय धावणे आणि महिला फौजदार प्रीती जाधव यांनी प्रकरणाचा तपास करून आरोपपत्र न्यायालयात सादर केले होते.

या खटल्यात सरकारतर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले. त्यात मयत धनश्री हिचे वडील, शेजारी राहणारे व्यक्ती, शिरापूरचे पोलीस पाटील,मृत्यूपूर्व जवाब नोंदवणारे तहसीलदार, वैद्यकीय अधिकारी यांची साक्ष महत्त्वाची ठरली. तसेच सरकारी पक्षाने मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने तिघांनाही जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावली.

या खटल्यात सरकारतर्फे ॲड. प्रकाश जन्नू तर आरोपीतर्फे ॲड.मिलिंद थोबडे यांनी काम पाहिले. तर कोर्ट पैरवी म्हणून हवालदार भोसले यांनी सहकार्य केले.

कुंभारी पुलाजवळ तरुण ठार

सोलापूर : कुंभारी ते सिद्धेश्वर साखर कारखाना या बायपास रोडवरील पुलाजवळ झालेल्या अपघातामध्ये दुचाकीवरील २३ वर्षीय तरुण जागीच ठार झाला. हा अपघात मंगळवारी घडला. प्रशांत गड्डप्पा गंगोडा (वय २३ रा. नागणसूर ता.अक्कलकोट) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. तो आज सकाळी ८ वाजेच्या सुमारास एमएच१३- डीझेड-३६९३ या दुचाकीवरू नागणसूर येथून कुंभारी मार्गे मजरेवाडी येथे मामाच्या घरी निघाला होता. कुंभारी बायपास रोडवरील ब्रिजवर अपघात झाल्याने गंभीर अवस्थेत आढळला होता. त्याला एमआयडीसीच्या पोलिसांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता तो उपचारापूर्वी मयत झाला.

पाठीमागून भरधाव येणाऱ्या कारच्या धडकेत युवकाचा मृत्यू

सुराज्य/सोलापूर

जर्सी गाई आजारी पडल्याने तीचे औषध आणण्यासाठी मोहोळ कडे मोटरसायकलवरून येत असताना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या कारने धडक दिल्याने युवकाचा मृत्यू झाल्याची घटना मोहोळ येथील चंद्रमौळी एमआयडीसी जवळ सोमवारी रात्री अकरा वाजता घडली.

याबाबत मोहोळ पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार वडवळ येथील योगीनाथ दिलीप शिवपुजे यांची जर्सी गाई आजारी पडली होती. त्यासाठी औषध आणण्यासाठी ते मोटरसायकल क्रमांक एम एच १३ एजी ८५२६ यावरून रात्री १०.३० वाजण्याच्या सुमारास वडवळ येथुन मोहोळ कडे येण्यास निघाले होते. मोहोळ येथील चंद्रमौळी एमआयडीसी जवळ आल्यानंतर त्यांना पाठीमागून भरधाव वेगाने येणाऱ्या कार एम एच ०४, एफ के ५००० ने जोराची धडक दिली. यात ते गंभीर जखमी झाले त्यांना तातडीने मोहोळ येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांना गंभीर मार लागला होता. डॉक्टरांनी उपचारापूर्वीच मृत्यू झाल्याचे सांगितले. याबाबत त्या कारचालकाच्या विरोधात मोहोळ पोलीस ठाण्यामध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा तपास मोहोळ पोलीस करत आहेत.

तिसरा डोळा

- प्रकाश पोरे

अरे नुसताच काय ये-जा करतोय, सेवा दे !

कल्याण
188-77-890

मुंबई
300-31-290

हुश्श, सरकारने सुस्कारा सोडला...

मनोज जरांगे-पाटील आमरण उपोषण मागे घेणार; दिली एक महिन्याची मुदत

सुराज्य/जालना

राज्य सरकारला अद्याप मराठा आरक्षणाचा तिढा सोडवता आलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोमवारी याप्रकरणी सर्वपक्षीय बैठक बोलावली होती. परंतु, या बैठकीतून काही निष्पन्न झाल्याचं दिसत नाही. त्यामुळे राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्याकडे एक महिन्याचा अवधी मागितला होता. मनोज जरांगे सरकारला वेळ देण्यास तयार नव्हते. परंतु, हे प्रकरण किचकट असल्यामुळे मनोज जरांगे यांनी आता वेळ देण्यास अनुकूलता दर्शवली आहे. आपली भूमिका स्पष्ट करताना मनोज जरांगे म्हणाले, आपण (आंदोलक) या सरकारला एक महिन्याचा वेळ दिला तरी मी ही जागा सोडणार नाही. तुमच्या हातात जातप्रमाणपत्र पडत नाही तोवर मी मागे हटणार नाही.

मनोज जरांगे उपोषणाला बसलेल्या आंदोलकांना म्हणाले, मराठा समाजाने सरकारला ४० वर्ष दिली आहेत, आता एक महिना देऊ. जरांगे पाटलांनी सर्व आंदोलकांना विचारलं की आपण या सरकारला एक महिना द्यायचा का? त्यावर सर्व आंदोलकांनी होकार दिला.

मनोज जरांगे आंदोलकाना म्हणाले, मी तुमचा सर्वांचा आहे, एक महिन्यात आरक्षण मिळालं नाही तर ३१ व्या दिवशी मी परत आमरण उपोषण करेन. पुढचे ३० दिवस इथे (अंतरवाली सराटी) आपलं आंदोलन सुरूच राहील. ३१ व्या दिवशी आरक्षण नाही दिलं तर सगळ्या मंत्र्यांना महाराष्ट्राची सीमा ओलांडू देणार नाही. मनोज जरांगे म्हणाले, मराठ्यांना जातप्रमाणपत्र मिळत नाही तोवर मी इथून हलणार नाही. महिनाभर लेकरांचं तोंड पाहणार नाही, घराचा उंबरा (उंबरठा) बघणार नाही. ज्या दिवशी जातप्रमाणपत्र हातात मिळेल त्या दिवशी आंदोलन मागे घेईन. मागन्या मान्य केल्या नाहीत तर आजपासून पुढच्या महिन्यात १२ तारखेला १०० एकरात विराट सभा घेऊ, जरांगे-पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांच्या पाच मागण्या : १) अहवाल कसाही आला तरीही महाराष्ट्रातल्या मराठ्यांना सरसकट प्रमाणपत्र द्यावं लागणार. २) महाराष्ट्रात जेवढे गुन्हे दाखल झाले आहेत तेवढे सगळे गुन्हे मागे घेतले जावेत. ३) जे अधिकारी दोषी आहेत त्यांचं निलंबन करा. ४) उपोषण सोडण्यासाठी मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्री आणि सगळं मंत्रिमंडळ तसंच छत्रपती उदयनराजे भोसले, छत्रपती संभाजीराजे भोसले हे सगळे तुमच्याबरोबर आले पाहिजेत. ५) मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री म्हणजेच सरकार हे सगळं आम्हाला लेखी हवं आहे वेळेची मर्यादा घालून दिली आहे हे त्यात नमूद करावं.

राज्य सरकारच्या सर्वपक्षीय बैठकीत तीन महत्त्वाचे निर्णय : दरम्यान सर्वपक्षीय नेत्यांनी एकत्र येत पहिल्यांदाच बैठक घेतली. यावेळी राज्य सरकारने तीन महत्त्वाचे निर्णय घेतल्याची माहिती दिली आहे. १) एक मताने मराठा आरक्षणासंदर्भात ठराव केला. २) महाराष्ट्रात आंदोलनात ज्या मराठा समाजाच्या लोकावर केसेस झाल्या होत्या. त्या सर्व केसेस मागे घेण्याचा निर्णय. ३) राज्य सरकारने मोठ्या तीन अधिकाऱ्यांना सस्पेंड केले आता ज्यांनी ज्यांनी आपल्या राज्यभरात महिलांवर हात उचलला होता. आता त्या सर्वांना सस्पेंड करणे.

आंध्रचा संघर्ष...

आंध्रप्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि तेलगू देसम पक्षाचे (टीडीपी) प्रमुख चंद्राबाबू नायडू यांना घोटाळ्याच्या प्रकरणाखाली अटक केल्यानंतर तेलगू देसम पक्षाचे कार्यकर्ते आक्रमक होणे साहजिकच आहे. कारण नेत्याला ठेस लागली की, कार्यकर्त्यांनाही रक्त यायला लागते. राज्यभर निषेध आंदोलने सुरू झाली आहेत. टीडीपीने वायएसआरसीपी सरकारविरोधात सोमवारी राज्यव्यापी बंद पुकारला होता. त्या पार्श्वभूमीवर सरकारने राज्यात फौजदारी प्रक्रिया कायद्यातील कलम १४४ लागू केले आणि राज्यभरात पोलिसांचा फौजफाटा तैनात केला. टीडीपी पक्षाचे नेते आणि माजी मुख्यमंत्री असलेल्या नायडू यांच्यावर अभूतपूर्व अशाप्रकारची कारवाई केल्यामुळे राज्यातील वातावरण चांगलेच तापले आहे. पोलीस प्रशासनाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी टीडीपीच्या अनेक नेत्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई केली. राज्यभरातील अनेक आंदोलकांना पोलीस ठाण्यात बंद केले आहे. नायडू हे २०१४-१९ या काळात मुख्यमंत्री असताना आंध्रप्रदेश कौशल्य विकास महामंडळामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप राज्याच्या गुन्हे अन्वेषण विभागाने केला आहे. त्याची चौकशी करण्यासाठी शनिवारी नायडू यांना अटक करण्यात आली. विजयवाडामधील लाचलुचपत प्रतिबंधक न्यायालयाने नायडू यांना १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीला अवघे काही महिने राहिले असताना तेलगू देसम पक्षाच्या प्रमुखांना अटक केल्यामुळे आंध्रप्रदेशचे राजकारण तापले आहेच, शिवाय विद्यमान मुख्यमंत्री आणि वायएसआरसीपी पक्षाचे प्रमुख जगनमोहन रेड्डी यांनी राजकीय आकसातून ही कारवाई केली असल्याचा आरोप विरोधकाकडून होतो आहे. गेल्या काही महिन्यांपासून चंद्राबाबू नायडू यांनी जगनमोहन सरकारविरोधात आक्रमक पवित्रा घेतला होता. राज्यभरातून टीडीपीच्या प्रदेश आणि जिल्हा पातळीवर नेत्यांना गृहकैदेत ठेवण्यात आले आहे. त्यामुळे

तेलगू देसम पक्षाला राज्यव्यापी आंदोलन उभारण्यात यश आलेले नाही. तेलगू देसम पक्षाच्या सर्व २१ आमदारांना पोलिसांच्या निगराणीत गृहकैद करण्यात आलीय. चंद्राबाबू नायडू १९८९ पासून सलग निवडून येत असलेल्या कुप्पम विधानसभा मतदारसंघात काही प्रमाणात आंदोलन झाले. नायडू यांचा हा बालेकिल्ला समजला जातो. राज्यात काही ठिकाणी बंदच्या पार्श्वभूमीवर टीडीपीच्या कार्यकर्त्यांनी रास्ता रोको आंदोलन करत रस्त्यावर जळते टायर पसरविण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी त्यांना वेळीच ताब्यात घेतले आणि कार्यकर्त्यांना नजरकैदेत ठेवल्याबद्दल सरकारवर टीका केली. आंध्रप्रदेशमध्ये आरोप प्रत्यारोपांना पूर आला आहे. टीडीपीचे प्रमुख एन. चंद्राबाबू नायडू यांनी राज्यासाठी काय केले? असा प्रश्न मुख्यमंत्री वाय. एस. जगनमोहन रेड्डी एका सभेमध्ये विचारला होता. त्याला उत्तर म्हणून टीडीपीने 'सेल्फी मोहीम' हाती घेतली आहे. टीडीपीचे अध्यक्ष चंद्राबाबू नायडू यांनी इमारतींसमोर फोटो घेत 'आमच्या काळात अशा प्रकारचे काम झाले,' असे नायडू म्हणाले आहेत. चंद्राबाबू नायडू यांचे पुत्र एन. लोकेश नायडू यांनीदेखील विकासकामांसोबतचा सेल्फी समाजमाध्यमांवर अपलोड करत जगनमोहन रेड्डी यांच्यावर टीका केली आहे. नायडू आणि रेड्डी यांच्यातील राजकीय संघर्ष विकोपाला चालला आहे. नायडू यांनी अमित शहा यांना भेटल्यानंतर नायडू हे पुन्हा एनडीएच्या वाटेवर असल्याची चर्चा झाली. कारण आज ना उद्या रेड्डींकडून आपल्याला त्रास होणार, याची कुणकुण नायडूंना लागलेली होती. नायडूंनी धोका दिल्यामुळे शहांनी त्यांच्यापासून चार हात लांबच राहिले. रेड्डी हे सरकारने सुरू केलेल्या काही कल्याणकारी योजनांच्या कार्यक्रमात बोलताना त्यांनी टीडीपी तसेच नायडू यांच्यावर टीका केली होती. विधान परिषदेच्या निवडणुकी रेड्डी यांच्या पक्षाची मते फुटली. क्रॉस वोटिंग केल्यामुळे त्यांनी चार आमदारांना पक्षातून निलंबित केले. मात्र, या घटनेमुळे टीडीपीचे दोन आमदार निवडून आले. या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर रेड्डी यांनी टीडीपीवर सडकून टीका केली. नायडू यांनी आंध्रप्रदेशासाठी काय केले? असा सवाल त्यांनी केला. त्यांच्याच प्रश्नाला उत्तर म्हणून टीडीपीने 'सेल्फी मोहीम' सुरू केली. आज रेड्डींच्या विरोधात वातावरण आहे. आंध्रची जनता पुन्हा नायडूंचे नेतृत्व स्वीकारण्याच्या मनस्थितीत आहे. त्यातूनच रेड्डी यांनी नायडूंचा पाठलाग सुरू केलेला असावा.

सामाजिक

आर्थिक एकीकरणाचा प्रभावी मार्ग

राजधानी नवी दिल्ली येथे दोनदिवसीय 'जी-२०' शिखर परिषदेचा समारोप रविवार १० सप्टेंबर रोजी झाला. भारतात काश्मीर व दिल्ली येथे 'जी-२०'च्या झालेल्या दोन्ही परिषदांतून भारताने फार मोठी उपलब्धी मिळविली आहे. काश्मीरमधील परिषदेच्या माध्यमातून काश्मिरातून ३७० कलम हटविल्यानंतरही तेथे सर्वत्र शांतता असून काश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक असल्याचा संदेश जगभर गेला आहे, तर दिल्ली परिषदेच्या माध्यमातून 'भारत-पश्चिम आशिया-युरोप कॉरिडोर'च्या निर्मितीच्या ठरावाने भारताच्या कूटनीतीचा विजय झाल्याचे मानले जात आहे.

देशातील सदस्य राष्ट्रांचे भारतासाठी आखाती देशातील व्यापाराला अत्यंत महत्त्व आहे. किंबहुना आखाती देशाशी भारताचा महत्त्वाचा व्यापार आहे. कतार, बहरिन, कुवेत, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात व ओमान हे देश एकत्रितरीत्या जीसीसी (गल्फ को-ऑपरेशन कौन्सिल) नावाने ओळखले जातात. 'जीसीसी' भारताचा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. २०२१-२२ या वर्षात 'भारत व जीसीसी' यांच्यात १५४ अब्ज डॉलरचा व्यापार झाला. त्यात निर्यात ४४ अब्ज डॉलर, तर आयात ११० अब्ज डॉलर होती. क्रूड ऑईल, रोजगाराच्या संधी या संदर्भात, गुंतवणूक, व्यापार, ऊर्जा, रेमिटन्स आदी अनेक क्षेत्रांत भारताचे आखाती देशांशी घनिष्ठ संबंध आहेत. भारताला दर दिवसाला ५० लाख बॅरल क्रूड ऑईल लागते. त्यापैकी ६०% क्रूड ऑईल आखाती देशांकडून मिळते. ७० व्या दशकापासून भारतीयांना आखाती देशात नोकरीच्या संधी उपलब्ध झाल्या असून आजमितीस जवळपास ८५ लाखांच्या वर भारतीय हे आखाती देशात नोकरी-व्यवसायानिमित्त राहात आहेत. आखाती देशातील (किंवा अन्य देशातील) भारतीय नागरिकांकडून भारताला जो पैसा मिळतो, त्याला 'रेमिटन्स' म्हणतात. या रेमिटन्समुळे परकीय चलन प्राप्त होऊन भारताच्या रुपयाला डॉलरच्या तुलनेत मजबुती येते. संयुक्त अरब अमिराती भारतातील 'इस्रो'कडून काही स्पेस उपकरणे खरेदी करणार आहे. त्याला अधिक उत्तेजन मिळेल. आखाती देश अन्न - धान्याच्या गरजेपैकी ८५% आयात करतात, त्यात ६२% तांदूळ व ५५% मांस भारताकडून दिले जाते. भारतात गुंतवणूक करणाऱ्या देशांमध्ये संयुक्त अरब अमिरात चौथ्या क्रमांकावर आहे. मागील वर्षी झालेल्या एका करारानुसार आखाती देश काश्मीरमध्ये अंदाजे ७० हजार कोटींची गुंतवणूक करणे अपेक्षित आहे.

असा असेल आर्थिक कॉरिडोर

आर्थिक कॉरिडोर हा 'पूर्व (पहिला) व उत्तर' (दुसरा) अशा दोन भागात असेल. पूर्व (पहिला) कॉरिडॉर हा भारताला पश्चिम आशियाशी (आखाती देशांशी) जोडेल, तर उत्तर (दुसरा) कॉरिडॉर हा पश्चिम आशियाला (आखाती देशांना) युरोपशी जोडेल.

१) पूर्व (पहिला) कॉरिडॉर : हा भारताच्या गुजरातच्या पश्चिम किनाऱ्यावरील मुंद्रा या बंदराला संयुक्त अरब अमिराच्या फूजैराह बंदराशी जोडेल व सौदी अरेबिया आणि जॉर्डनमार्गे रेल्वेमार्ग वापरून प्रमाणित कंटेनरद्वारे मालाची वाहतूक इस्रायलच्या हैफा या बंदरापर्यंत करेल. २) उत्तर (दुसरा) कॉरिडॉर : हैफा येथून भारतीय

माल फ्रान्समधील मार्सेल बंदर तसेच जर्मनी व इटलीच्या बंदरापर्यंत पोहोचेल. या कॉरिडॉरमुळे डेटा, लोहमार्ग, वीज, हायड्रोजन पाइपलाइन आदी क्षेत्रात लाभ होईल. संयुक्त अरब अमिरात, सौदी अरेबिया, जॉर्डन, इस्रायलसह मध्यपूर्वेतील रेल्वे व जहाज मार्ग वाहतुकीत समन्वय साधला जाईल. भारताला पश्चिम मध्य आशिया व युरोपपर्यंत व्यापाराच्या संधी मिळून भारताच्या व युरोपमधील व्यापारात अंदाजे ४० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. हा कॉरिडॉर सध्याच्या तुलनेत स्वस्त व वाहतुकीस जलद मार्ग असून भविष्यात हा ग्रीन कॉरिडॉर होण्याची शक्यता आहे. 'ग्रीन कॉरिडॉर' म्हणजे एक खास वाहतूक मार्ग, ज्यामधील सर्व सिग्नल मॅन्युअली मोडद्वारे वापरले जातात व गरजेनुसार वळविले जातात.

भारताचा कूटनितीक विजय

'जी-२०'च्या शिखर परिषदेच्या जाहीरनाम्यासंदर्भात सर्व राष्ट्रांचे एकमत करणे, त्याचप्रमाणे रशियाचा नामोल्लेखही न करता युक्रेन युध्दाचा उल्लेख करणे; यासाठी रशिया व अमेरिकेची संमती मिळवणे हे एक मोठे यश आहे. हे करण्यासाठी भारताने रशिया तसेच अमेरिकेसह युरोपियन राष्ट्रांना समर्थपणे हाताळले. यातच भारताची मुत्सद्देगिरी दिसून आली. शिवाय आफ्रिकन युनियनलाही जी-२० गटात नवीन सदस्य म्हणून सामावून घेण्याच्या भारताच्या प्रयत्नांना सर्वांनी संमती दिली; यातही भारताचे प्रभावीपण नजरेत येते. भारताच्या अध्यक्षतेखालील जी-२० परिषद ही 'वसुधैव कुटुंबकम', 'एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' या संकल्पनेवर आधारित असून नवीन आर्थिक कॉरिडॉरमुळे या संकल्पनेला बळकटीच मिळणार आहे. शिवाय हा नवा कॉरिडॉर चीनच्या 'वन बेल्ट ॲन्ड ईनिशियेटिव्ह' योजनेला भारताने मुत्सद्देगिरीने दिलेले प्रभावी उत्तर आहे असेही मानले जाते. सोबतच आखाती देशासोबत असलेल्या आपल्या व्यापारातही वृध्दी करण्याची संधी याद्वारे भारताने साधली आहे.

मध्य पूर्वेकडील देशांमध्ये चीनने आपला प्रभाव वाढविला आहे. प्रथम देशांना कर्ज देऊन व कर्ज परतफेडीस देश असमर्थ झाल्यास त्या देशाची भूमी लीजद्वारे बळकावण्याचा चीनचा हेतू जगासमोर उघड झाला आहे. पाकिस्तानचे व श्रीलंकेचे बंदर हे त्याची ज्वलंत उदाहरणे आहेत. अमेरिकेलाही चीनच्या वाढत्या प्रभावाला शह देण्याची संधी हवी होती. त्यामुळे जी-२०च्या माध्यमातून सर्व देशांच्या सहकार्याने ही योजना यशस्वी होणे हे अमेरिकेलाही फायद्याचेच आहे. याद्वारे अरब आखाती देशात रेल्वे विस्तार व रेल्वेचे मजबूत जाळे होणार आहे. त्यामुळे भारताच्या या भागातील देशांशी असलेल्या व्यापारात वाढ होऊन त्यात गती निर्माण होईल, तर काही ठिकाणी व्यापाराच्या नवीन संधीही उपलब्ध होण्याची शक्यता आहे. तसेच त्यामुळे या भागातील चीनच्या वाढत्या प्रभावालाही आळा बसू शकेल. त्यामुळे भारतासाठी तसेच जागतिक आर्थिक एकीकरणाच्या दृष्टीने सुद्धा हा आर्थिक कॉरिडोर प्रभावी ठरेल असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

- भालचंद्र ठोंबरे.

टुडेज् ब्लॉग

शिक्षकांना शाळाबाह्य कामातून हवीय मुक्ती

शिक्षकांना मनमोकळेपणाने अध्यापन करण्यासाठी शाळाबाह्य कामातून शासनाने मुक्त करावे म्हणजे बिनधास्तपणे शिक्षक अध्यापन करतील. त्यामुळे त्यांच्या मनावरील ताण कमी होईल. तेव्हा अशी कामे शासनाने स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना द्यावीत. आज अनेक ठिकाणी मुलांचा पट कमी झाल्याने शिक्षकांची संख्या सुद्धा कमी करण्यात आली. मी माझ्या आयनल गावच्या प्राथमिक शाळेत असताना दोन शिक्षक होते. वर्ग मात्र पहिली ते सातवीपर्यंत. त्यात कदम गुरुजी अध्यापनात कुशल असल्यामुळे शासनस्तरावर दिलेली कामे वेळच्या वेळी पूर्ण करायचे. मात्र, अध्यापनामध्ये कधी दुर्लक्ष केले नाही. त्यात सात वर्ग प्रत्येकी पाच ते सात विषय, पाचवीपासून तीन भाषा यामुळे साहजिकच शिक्षकीपेशा त्रासदायक म्हणावा लागेल. कारण अध्यापन करत असताना पहिल्या प्रथम पुस्तकांचा स्वत: अभ्यास करून त्या धड्याचा आशय समजून घ्यावा लागतो. जर आशय समजला तरच अध्यापक खुल्या मनाने अध्यापन करू शकतात. ते सुद्धा त्यांचा घरप्रपंच सांभाळून. तेव्हा त्यांना सुद्धा वेळ देणे आवश्यक असते. शिक्षकांना शाळाबाह्य कामे दिल्याने त्यांचा अध्यापनाकडे दुर्लक्ष होतो. याचा परिणाम चांगले विद्यार्थी घडू शकत नाही. त्यासाठी अध्यापकांना अध्यापनाचे काम द्यावे. मात्र, या दृष्ट चक्रातून अध्यापकांना बाहेर काढावे लागेल तरच चांगले विद्यार्थी निर्माण होऊ शकतात.

आता शिक्षकांना कोणकोणती शाळाबाह्य कामे करावी लागतात याचा थोडक्यात आढावा येऊ. प्राथमिक विभागातील शिक्षकांचा विचार करता त्यांना शाळा उघडण्यापासून बंद करणे, शाळेचा दप्तर तसेच शाळेची साफसफाई करण्यापर्यंत सर्व कामे करावी लागतात. ही कामे माध्यमिक विभागातील शिक्षकांना करावी लागत नाही. त्यासाठी स्वतंत्र स्टाफची नियुक्ती केली जाते. त्यामुळे ते अध्यापनावर लक्ष केंद्रित करतात. आपल्या राज्यात आज पाहिल्यावर अध्यापकांचे ऑफलाईन काम सुरू आहे. त्यात काही वेळा ऑनलाइन मिटिंग सुद्धा असतात. ऑनलाइन कामाचा विचार करता शाळेत आपल्यावर मोबाइलमध्ये मुलांचे फोटो काढायचे आणि शिक्षण विभागाला पाठवायचे. म्हणजे शाळेतील मुलांची हजेरी झाली त्यात रेंजचा लपंडाव असतो, त्यामुळे सध्याचे शिक्षक वर्ग जेरीस आलेले दिसतात. कोरोना काळात तर शाळेच्या समोर असणाऱ्या झाडाखाली बसून चाकरमान्यांची देखरेख करण्याचे काम केले. आता अधिक विस्ताराने त्यांच्या कामाचा विचार करू. यामध्ये ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा, विधानसभा व लोकसभा इत्यादी निवडणुकांमध्ये शाळा बंद ठेवून काम करावे लागते. त्यात आधी प्रभागातील मतदार याद्या तयार कराव्या लागतात. तसेच गावातील साक्षर व निरक्षर यांचे सर्वेक्षण करावे लागते. गावची जनगणना व गावातील दारिद्र्यरेषेखाली जे लोक जीवन जगत आहेत, त्यांचा सर्व्हे करावा लागतो.

अध्यापक ज्या शाळेमध्ये अध्यापन करतात त्याच शाळेत अध्यापनाबरोबर शाळेत शालेय व्यवस्थापन समिती, पालक समिती, मातापालक समिती, शालेय पोषण आहार समिती, विद्यार्थिनी सुरक्षा समिती व व्यसनमुक्ती समिती अशा विविध समित्या तयार करून समित्यांची बैठक घेणे तसेच त्या बैठकीचे इतिवृत्त शिक्षकांना लिहावे लागते. त्याचप्रमाणे शाळेतील मोफत पाठ्यपुस्तक योजना शाळेच्या पटसंख्येनुसार वर्गवार पुस्तकाची मागणी करावी लागते. त्यासाठी तालुक्याच्या ठिकाणी जाऊन क्रमिक पुस्तके आणावी लागतात. त्याप्रमाणे पुस्तकांचे प्रत्येक विद्यार्थ्यांना वाटप करावे लागते तसे शाळेच्या रजिस्टरमध्ये विद्यार्थ्यांच्या नावांची नोंद करून त्यावर त्यांची सही घ्यावी लागते. एक प्रकारे अध्यापन बाजूला सारून कारकुनाची कामे करावी लागतात, असे म्हणावे लागेल. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार स्टॉक व लाभार्थी ऑनलाइन करावे लागतात त्यासाठी शाळा व एकूण विद्यार्थ्यांची माहिती द्यावी लागते. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे परीक्षेत मिळालेले गुण, शाळेची माहिती गुणपत्रिकेत लिहावी लागते. तसेच खाडाखोड न करता मुलांचे शाळेचे दाखले लिहून द्यावे लागतात. मुलांच्या आरोग्याबरोबर त्यांचे विविध शिष्यवृत्तीसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन फॉर्म भरून विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीच्या अभ्यासक्रमाची तयारी करून घेत असतात. त्याचप्रमाणे मुलांचे शिष्यवृत्ती परीक्षेचे हॉल तिकीट काढावे लागते. तसेच ज्या केंद्रावर परीक्षा असेल त्याठिकाणी मुलांना घेऊन जाणे व परत त्यांच्या घरी सोडण्याचे काम करतात. शाळेत दिव्यांग विद्यार्थी असेल तर त्याची विशेष काळजी घेत असतात. अलीकडे तर आपल्या परिसरातील शाळाबाह्य मुलांचा शोध घेऊन शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे काम त्यांना देण्यात आले आहे. म्हणजे असे भावी पिढी सुशिक्षित करणाऱ्या शिक्षकांना अनेक शाळाबाह्य कामे करावी लागतात. तेव्हा शिक्षकांना 'शिकवू द्या व विद्यार्थ्यांना शिकू द्या' या मागणीसाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीला शिक्षक दिनी रजा आंदोलन करण्याची वेळ आली. तेव्हा पुन्हा आपल्या न्याय मागणीसाठी आंदोलन करण्याची सामूहिक वेळ राज्यातील प्राथमिक शिक्षकांवर येऊ नये यासाठी शिक्षकांच्या घोषवाक्याचा विचार करून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी म्हणजे शिक्षक शाळाबाह्य कामातून मुक्त होऊन हसत-खेळत अध्यापन करतील.

- रवींद्र तांबे.

जन्म हा अखेरचा

शुश्रूषुस्थल - १

असे शंकराचार्यांनी वृद्ध शरीराचे वर्णन केलेले आहे. गात्रे थकली, डोके पांढरे झाले, तोंडातले दात गेले असा वृद्ध हाती काठी घेऊन चालत असला तरी त्याच्या आशा सुटलेल्या नसतात. बालपणाचे ताजे टवटवीत शरीर म्हातारपणी कसे कळाहीन होऊन जाते. याचा आपल्याला अनुभव येत असतो. एकाच मनुष्याचे बालपणी काढलेले छायाचित्र म्हातारपणी काढलेल्या छायाचित्राजवळ ठेवून पाहिले तर एका शरीरात किती फरक पडला हे लक्षात येईल. अशी शरीरे आपण किती बदलली कुणास ठाऊक! म्हणून एका जन्मात आपले शरीर श्रीगुरुला अर्पण केले पाहिजे. शरीर हे असत्य आहे.

श्रीगुरुला विचारले पाहिजे की परमात्मा कोण आहे? तेंव्हा श्रीगुरु सांगतील की परमात्मा सर्व चराचरांत व्याप्त आहे आणि तुझा आत्मा म्हणजे त्याचाच अंश आहे. मनुष्याला शरीराविषयी अभिमान वाटत असतो. त्यामुळे त्याला दु:खे भोगावे लागते. शरीर हे दु:खाचे मूळ असले तरी शरीर सोडून द्यायचे मात्र नसते. सोडायचा असतो तो शरीराचा अभिमान. या मांसल शरीरात अमृतमय असा आत्मा नांदत असतो. म्हणून गुरुला हे प्रश्न विचारुन त्यांची उत्तरे नीट समजावून घेतली पाहिजेत.

श्रुत्वा गुरोर्वाक्यं शिवसाक्षात्क्रियावहम् ।
उपशाम्यति य: स्वान्ते स मुक्तिपदमाप्नुयात् ।।१७.७०।। गुरुजवळ जाऊन त्यांचा उपदेश पुन्हा पुन्हा श्रवण केला पाहिजे. जोपर्यंत ज्ञान दृढ होत नाही तोपर्यंत गुरुपदेश पुन्हा पुन्हा ऐकला पाहिजे. तुम्ही जेवण करता तेव्हा किती काळ खात असता? पोट भरेपर्यंत. तृप्त होईपर्यंतच मनुष्य खात असतो. तहान भागेपर्यंत तृषार्त मनुष्य पाणी पीत असतो. काय खावे? किती खावे? याचे आपल्याला चांगले ज्ञान असते. परंतु गुरुचा उपदेश किती ऐकावा याविषयी काही माहिती नसते. गुरुंचा उपदेश वारंवार ऐकावा. आत्मज्ञान होईपर्यंत श्रवण करावा. जागे झाल्यापासून झोपेपर्यंत ऐकावा. जन्म झाल्यापासून मरेपर्यंत ऐकावा. जोपर्यंत श्रवण करण्याची शक्ती आहे तोपर्यंत ऐकावा. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

जनमानस

डिजिटल जगतातही संताचे विचार प्रेरणादायी...

जागतिक स्तरावर भारतीय संस्कृतीला सर्वश्रेष्ठ, मानाचे स्थान आहे आणि याचं भारत भूमीमध्ये थोर साधू-संत होऊन गेले आहेत. आपल्या आदर्श विचारांच्या आधारे व प्रगल्भ



बुद्धिमत्तेच्या जोरावर समाजाला व राष्ट्राला योग्य मार्गदर्शन त्यांनी केले आहे. समाजातील अनिष्ट रूढी, परंपरा, चालीरीती, अंधश्रद्धा यांच्यावर जोरदार प्रहार करून सामाजिक मनोधैर्य उंचावण्याचे महान कार्य या थोर संतांनी केले आहे. कोणत्याही गोष्टीची लालसा न ठेवता अत्यंत साधेपणाने व त्यागी जीवन जगून समाजाची सेवा केली आहे. परंतु आजचा आपला समाज हा थोर संतांचे विचार विसरत चालला आहे.

या महान संतांच्या कार्याचा विसर आजच्या समाजाला पडला आहे. सध्याच्या ढोंगी संधिसाधू महाराज, बुवाबाजी यांच्या मागे लागून अंधश्रद्धेच्या चक्रव्यूहात अडकू लागला आहे. आज झपाट्याने सर्वच क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन होत असताना आणि आधुनिक डिजिटल जगतात वावरणारा समाज विचाराने दुबळा बनू लागला आहे. नेमका याच गोष्टीचा गैरफायदा ढोंगी महाराज घेत आहेत. यातून मग विनयभंग, लैंगिक अत्याचार, बलात्कार, आर्थिक फसवणूक, खून, मारामारी असे प्रकार घडताना दिसून येतात.

आजच्या समाजाने या ढोंगी महाराजांच्या मागे न लागता अंधश्रद्धा सोडून विचाराने प्रगत बनण्याची गरज निर्माण झाली आहे.

- राजू जाधव, मांगूर, जि. बेळगाव.

प्रत्येक गोष्टीत राजकारण नको

सर्वसामान्य जनता आपले काही प्रश्न मांडण्यासाठी किंवा अन्यायकारक गोष्टी विरोधात आंदोलने करतात. यासंदर्भात चर्चा करून समस्या सोडवण्यासाठी प्रयत्न होऊ शकतात. पण बऱ्याच वेळेला आंदोलन दडपण्याचा प्रयत्न होतो. याकाळात आंदोलन कसे चुकीचे आहे यावर सोशल मीडियावर पोस्ट येतात. राजकीय नेते प्रत्येक गोष्टीत राजकारण पाहतात. सर्वसामान्य माणूस आपले आयुष्य सुखद असावे, अशी अपेक्षा करतो.

- पी. एम. काळे, नाशिक.

विशेष अधिवेशनाचा घाट कशासाठी?

मोदी सरकारने बोलावलेल्या विशेष अधिवेशनाचा अजेंडा काय आहे हा प्रश्न विरोधक विचारत आहेत. एक देश एक निवडणुकीची घोषणा करणार, इंडियाऐवजी देशाचं फक्त 'भारत' हे नाव ठेवणार, नव्या संसदेचा श्रीगणेशा होणार अशा चार पाच मुद्द्यांची जोरदार चर्चा सुरु आहे. मात्र, सरकारने अजूनही अधिकृत उत्तर दिलेलं नाही. १८ तारखेला सध्याच्या म्हणजे जुन्या संसदेत अधिवेशनाला सुरुवात होईल. त्यानंतर दुसऱ्या दिवशीपासून म्हणजे गणेश चतुर्थीच्या मुहुर्तावर नव्या सेंट्रल विस्टामध्ये अधिवेशन भरेल अशी माहिती एएनआयने दिलीय. याच पार्श्वभूमीवर दिल्लीत घडामोडींनी वेग घेतल्याचं चित्र दिसलं.

माजी राष्ट्रपती कोविंद यांच्या घरी 'एक देश, एक निवडणूक' यासाठीची बैठक झाली. इंडिया आघाडीच्या समन्वय समितीची पहिली बैठक १३ तारखेला शरद पवारांच्या घरी होईल, अशी माहिती खासदार संजय राऊत यांनी दिली. तर त्या आधी काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी थेट पंतप्रधान नरेंद्र मोदींना एक पत्र लिहिलं आणि अधिवेशनाचा अजेंडा विचारला आहे.

जनहिताची तातडीची गरज म्हणून संसदेचं विशेष अधिवेशन बोलावलं जातं. आतापर्यंत विशेष अधिवेशनात फक्त एकदाच विधेयकावर चर्चा झालीय, ती म्हणजे जीएसटी कायद्याच्यावेळी. त्यामुळे या विशेष अधिवेशनात नेमकं काय होणार याचं रहस्य कायम आहे. या आधी सुद्धा विशेष अधिवेशनं बोलावल्या गेली आहेत. देशाच्या स्वातंत्र्याला ५० वर्षे पूर्ण झाली तेव्हा म्हणजे १९९७ चं विशेष अधिवेशन किंवा २००८ सालच्या अणुकरारावरुन डाव्यांनी पाठिंबा काढल्यांवर विश्वासदर्शक ठरावासाठी मनमोहन सिंह सरकारने बोलावलेलं विशेष अधिवेशन ही त्याची काही महत्त्वाची उदाहरणं. अशाच वेगवेगळ्या कारणांसाठी याआधी विशेष अधिवेशन घेण्यात आली आहेत. त्यातील काही महत्त्वाच्या अधिवेशनांवर एक नजर टाकुयात..

▶ १९७७ साली २८ फेब्रुवारी आणि १ मार्च असे दोन दिवस राज्यसभेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं होतं. यात तामिळनाडू आणि नागालँडमधील राष्ट्रपती शासनाची मुदत वाढवली होती. ▶ १९९१ साली ३ आणि ४ जूनला हरियाणातील राष्ट्रपती

शासन वाढवण्यासाठी दोन दिवसांचं विशेष अधिवेशन बोलावलं होतं. या दोन्ही वेळी लोकसभा विसर्जित असल्याने फक्त राज्यसभेचं विशेष अधिवेशन बोलावलं होतं. ▶ १९९२ साली ९ ऑगस्टला 'भारत छोडो' आंदोलनाला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यावेळी मध्यरात्री संसदेचं विशेष अधिवेशन बोलावण्यात आलं होतं. ▶ २००२ साली वाजपेयींच्या एनडीए सरकारने २६ मार्चला संसदेचं संयुक्त अधिवेशन बोलावलं होतं. यात पोटा हा दहशतवाद विरोधी कायदा पारित करुन घेतला होता. ▶ २६ नोव्हेंबरला घटना समितीने राज्यघटना स्वीकारली होती. त्याला ५० वर्षे तसंच ७० वर्षे पूर्ण झाली, तेव्हा सुद्धा विशेष संयुक्त अधिवेशन बोलावण्यात आलं होतं. ▶ २०१७ साली ३० जूनला मोदी सरकारने जीएसटी लागू करण्यासाठी लोकसभा आणि राज्यसभेचं विशेष संयुक्त अधिवेशन बोलावलं होतं. ▶ राष्ट्रपतींची अंतिम मोहोर असली तरी संसदेचे अधिवेशन बोलावण्याचा निर्णय संसदीय कामकाज समिती घेत असते. या समितीमध्ये गृह, संरक्षण, वित्त, कृषी, कायदेमंत्री अशा १० महत्त्वाच्या मंत्र्यांचा समावेश आहे. समितीच्या निर्णयाची माहिती लोकसभा अध्यक्षांना दिली जाते, नंतर राष्ट्रपतींच्या नावे इतर सदस्यांना अधिवेशनासाठी आंमत्रित केलं जातं. ▶ वर्षभरात संसदेचे अर्थसंकल्पीय, पावसाळी आणि हिवाळी अशी तीन अधिवेशनं होतात. त्या शिवाय विशेष अधिवेशनसुद्धा बोलावता येते. खरं तर घटनेमध्ये विशेष अधिवेशन असा कोणताही वेगळा प्रकार नाही. मात्र, कलम ८५ (१) मध्ये इतर अधिवेशनाप्रमाणेच असं विशेष अधिवेशन बोलावण्याचा अधिकार राष्ट्रपतींना आहे. असं असलं तरी घाईगडबडीत, गणेश उत्सवाच्या काळात, विश्वासात न घेता विशेष अधिवेशन बोलावलं याला विरोधी पक्षांनी आक्षेप घेतला आहे. काँग्रेस नेत्या सोनिया गांधी यांनी तर पंतप्रधान नरेंद्र मोदींना पत्र पाठवलं. त्यात ९ महत्वाच्या मुद्द्यांवर विशेष अधिवेशनात चर्चा व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केलीय. विरोधकांसह सर्वांसाठीच हा सरप्रेन्स सरकारने कायम ठेवलाय. या विशेष अधिवेशनात पाच बैठका होतील. अमृत काळात संसदेत फलदायी चर्चा होईल, अशी सरकारची अपेक्षा असल्याचं संसदीय कामकाजमंत्री प्रल्हाद जोशी यांनी अधिवेशनाची सूचना देणाऱ्या ट्विटमध्ये म्हटलं होतं. आपण सुद्धा सत्ताधारी आणि विरोधक दोघेही देशहिताची, जनहिताची काहीतरी फलदायी चर्चा करतील, अशी दोघांकडूनही अपेक्षा करुयात.

- संदीप रामदासी.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



‘काम बंद’मुळे झेडपीचे कामकाज ठप्प

जिल्हाभरातील कार्यालयात शुकशुकाट

प्रशासनास विविध संघटनांचे निवेदन

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनाची तोडफोड करणाऱ्या व्यक्तींवर कडक कारवाई करण्याच्या मागणी साठी जिल्हा परिषदेच्या अधिकारी व कर्मचारी संघटनेने निषेध व्यक्त करून काम बंद आंदोलन सुरूच ठेवले आहे. जिल्ह्यात सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी उस्फुर्त पण काम बंद आंदोलन सुरू ठेवले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात येऊन काही व्यक्तींनी खिडक्यांचे काचा फोडले. कार्यालयातील खुर्ची अस्ताव्यस्त केले. या घटनेचा निषेध आज सर्व कर्मचारी व अधिकारी यांनी गेटवर व्यक्त करून आज जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन राजपत्रित अधिकारी संयटना व विविध कर्मचारी संघटनेच्या वतीने निवेदन दिले.

राजपत्रित अधिकारी यांचे वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी उप जिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांना निवेदन दिले. जिल्हा परिषदेच्या विविध कर्मचारी संघटनांच्यावतीने उप जिल्हाधिकारी विठ्ठल उदमले यांना निवेदन दिले. दरम्यान जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनिषा आव्हाळे यांना राजपत्रित संघटनेच्या वतीने अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी निवेदन दिले. जिल्हा परिषदेचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी इशाधिन शेळकंदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मिनाक्षी वाकडे, यांच्यासह विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा परिषेद मुख्यालयाचे मुख्य द्वारा जवळ अधिकारी ंकर्मचारी यांनी एकजुट दाखवून हल्ल्याचा निषेध व्यक्त केला. अधिकारी व कर्मचारी यांनी एकजुट दाखवून संबंधितांवर कारवाई करण्यासाठी घोषणाबाजी केली.

यावेळी कर्मचारी संघटनेचे विवेक लिंगराज, लिपिक वर्गीय संघटनेचे अध्यक्ष अविनाश गोडसे, संघटनेचे राजेश देशपांडे, कंत्राटी कर्मचारी संघटनेचे प्रदेश अध्यक्ष सचिन जाधव, कर्मचारी संघटनेचे गिरीष जाधव, महसूल कर्मचारी संघटनेचे शंतनू गायकवाड, मध्यवर्ती शासकीय व निमशासकीय संघटनेचे समन्वयक अशोक इंदापुरे, जिल्हा प्राथमिक संघाचे मच्छिंद्रनाथ मोरे, प्राथमिक शिक्षक संघटनेचे शिवाजीराव पवार मरवडे, दिव्यांग संघटनेचे अध्यक्ष लक्ष्मण वंजारी, महिला कर्मचारी संघटनेच्या अनुपमा पडवळे, नागेश पाटील, दिनेश बनसोडे, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे मल्लिकार्जून देशमुख, कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष सचिन सोनकांबळे, सचिन मायनाळ, एस. पी. माने, यांच्यासह शेकडो कर्मचाऱ्यांनी अधिकारी संघटनेच्या वतीने निवेदन दिले.

माझ्या कर्मचार्यांना बोललेले सहन करणार नाही : सीईओ

पोलिस प्रशासनाने योग्य ती कार्यवाही केलेली आहे. सर्वांनी शांततेच्या मार्गाने जावे. मी कर्मचारी यांना हक्काने बोलेन मात्र माझे कर्मचारी यांना कुणी बोललेले सहन करणार नाही. असे सांगून सिईओ मनिषा आव्हाळे यांनी कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. कार्यालयात आत येत असताना अधिकारी व कर्मचारी यांनी सिईओ यांना मुख्यालयाच्या दरवाजासमोर सर्व कर्मचारी व अधिकारी आपल्या समवेत असल्याचे सांगितले. ज्यांनी हे कृत्य केले आहे अशांवर गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आपल्या यंत्रणेवर विश्वास ठेवा. संबंधितांवर नक्कीच कारवाई करतील. असे आवाहन कर्मचारी व अधिकारी यांना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले.

कारवाई होई पर्यंत कामबंद आंदोलन : कोहिणकर

सर्व राजपत्रित अधिकारी यांचे वतीने जिल्हा परिषदे मध्ये घडलेल्या घटनेचा निषेध करत अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी निंदनीय कृत्य करणारेंवर कठोर कारवाई न झालेस काम बंद आंदोलन सुरूच ठेवणार असल्याचे सांगितले. उद्या बुधवारी याबाबत निर्णय घेणेत येणार असल्याचे कोहिणकर यांनी सांगितले.

प्राचार्य डॉ. हारून बागबान यांना अवॉर्ड ऑफ एक्सेलेन्स पुरस्कार

सोलापूर : असोसिएशन ऑफ मुस्लिम प्रोफेशनल्स (एएमपी) इंडियाच्यावतीने एम. ए. पानगल अँग्लो उर्दू हायस्कूल आणि ज्युनियर कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूरचे प्राचार्य डॉ. हारून रशीद अहमदसाहब बागबान यांना त्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट सेवेची दखल घेऊन प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील अवॉर्ड ऑफ एक्सेलेन्स-२०२३ या उत्कृष्टता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले तसेच सुशील कुमार उर्दू सार्वजनिक वाचनालय सोलापूर यांच्यावतीनेही अल हुसैनी पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. संस्थेचे व्यवस्थापन मंडळ व सदस्य, पालक, मित्र आणि माजी विद्यार्थी. शिवाय, मुख्तार पेरमपल्ली सर, अमीन कुरेशी, साहिर नदाफ, राजा बागबान, तसेच डॉ. सुरैय्या जहागीरदार (उप मुख्यध्यापिका), महंमद अली शेख, वसीम नल्लामंदु, निकहत नल्लामंदु, झाकीर शाहपुरे, फरजाना नदाफ, अल्ताफ सिद्दीकी, इद्रिस पेरमपल्ली, मोहसीन माशाल, मेहमूद खतीब, युसूफ आलम सिद्दीकी, सादिक बागबान, मुजम्मील शेख, जुल्किफल बागबान, ईसहाक बाटघर, शबनम बागबान, शमशाद शेख इत्यादी व्यतिरिक्त सर्व कर्मचारी सदस्यांनी डॉ. हारून रशीद अहमद साहब बागबान सर यांचे अभिनंदन केले.

अल्पवयीन कॉलेज तरुणीस फूस लावून पळवून नेले

मंगळवेढा : मंगळवेढा येथे कॉलेजला गेलेल्या १७ वर्षीय अल्पवयीन कॉलेज तरुणीस अज्ञात कारणावरून अज्ञात व्यक्तीने फूस लावून पळवून नेल्याचा प्रकार घडल्याने तिच्या वडीलांनी पोलिसांत तक्रार दिल्यानंतर अज्ञात व्यक्तीविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. या घटनेची हकिकत अशी,श्री संत दामाजी कॉलेजच्या गेटवर दि.११ रोजी सकाळी ७.३० वा. त्या अल्पवयीन मुलीस तीच्या वडिलांनी गाडीवर नेवून सोडले होते. वडील पुन्हा ११.३० वा. मुलीस आणणेकरीता गेले असता ती गेटवर न दिसल्यामुळे वडिलांनी तिच्या वर्गात जावून विचारपूस केल्यावर ती सकाळी ८ वा. कॉलेजमध्ये आली नसल्याचे समजले. तदनंतर वडिलांनी घरी व अन्यत्र चौकशी करून शोध घेतला असता ती मिळून आली नसल्याने कायदेशीर रखवालीतून कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अज्ञात कारणावरून फूस लावून पळवून नेले असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तिचे वर्णन-उंची ५ फुट, चेहरा गोल व नाक सरळ, अंगात नेसणेस लाल टॉप,पांढरी पँट,शिक्षण बारावी चालू अशा वर्णनाची मुलगी कोणाच्या निदर्शनास आल्यास त्यांनी मंगळवेढा पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

मुडवी येथे कोयत्याने मारहाण; पिता-पुत्र जखमी

सोलापूर : भाऊकितील शेतजमिनीच्या कारणावरून कोयता आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत पितापुत्र जखमी झाले. ही घटना मुडवी (ता.मंगळवेढा) येथे आज मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली. अमोल सुभाष शिवपुजे (वय २५) आणि त्याचे वडील सुभाष शिवपुजे (वय ५४ रा. मुडवी) अशी जखमी पिता -पुत्राची नावे आहेत. त्यांना मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रवींद्र शिवपुजे याने मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

शिक्षणामुळेच जगात बंधुभाव वाढेल : फादर सल्डाना

सुराज्य/सोलापूर

आज जगात स्नेह, प्रेम आणि मानवता हिच खरी शिक्षा देण्याची गरज आजच्या शिक्षकांवर आहे. या शिक्षणामुळे जगात बंधुभाव वाढेल लोकांच्या मनामध्ये जे एकमेकांमध्ये द्वेष आहे दूर होतील व मानवतेमध्ये एकमेकांविरुध्द आदर वाढेल ज्यामुळे राष्ट्रात एकमता टिकू राहील, असे उद्गार फादर सल्डाना यांनी पुरस्कार वितरण कार्यक्रमात शिक्षकांसमोर मांडले.

लायन्स क्लब ऑफ सोलापूर क्लासिकच्यावतीने दरवर्षी शहर व जिल्ह्यातील वेगवेगळ्या शाळा व महाविद्यालयात कार्यरत असलेल्या शिक्षकांना लायन्स आयडियल टिचर्स वॉर्ड २०२३ ने ऑफीसर क्लबजवळील राज महल येथे शनिवारी झालेल्या कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमात रिजनल चेअरम एमजेएफ ला. राजेंद्र शहा कासवा, उपडिस्ट्रीक्ट गर्व्हनर एमजेएफ ला. ड. एम. के. पाटील, आय.पी. डिस्ट्रीक्ट गर्व्हनर एमजेएफ ला. राजशेखर कापसे, जि.प.चे शिक्षणाधिकारी (प्लॉनिंग) सुलभा वटारे, झोन चेअरमन ला. चंद्रकांत यादव, ड. विद्या कटकधोंड आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते तर ला. शब्बीर शेख, ला. आसिफ इक्बाल, पीडीजी एमजेएफ ला. डॉ. एन.के. चंडक, पीडीजी एमजेएफ ला. डॉ. गुलाबचंद्र कासलीवाल, पीडीजी एमजेएफ ला. अशोक मेहता, पीडीजी एमजेएफ ला. अरविंद कोनर्सीगी, पीडीजी एमजेएफ ला. डॉ. गुलाबचंद शहा, पीडीजी एमजेएफ ला. डॉ. प्रा. झपके, पीडीजी एमजेएफ ला. डॉ. व्यंकटेश यजुर्वेदी, पीडीजी एमजेएफ ला. जितेंद्र दोशी आदीजण व्यासपीठावर उपस्थित होते.

लायन्स क्लब इंटरनॅशनलतर्फे शिक्षक दिनानिमित्त उत्कृष्ट शिक्षकांचा लायन्स आयडियल टिचर्स वॉर्ड २०२३ ने सन्मान करण्यात आला. यात पुढील शिक्षकांना हे पुरस्कार मिळाले- रेव्ह. गोडवेन सालधाना, डॉ. स्फुर्ती बिराजदार, रिजवान शेख, अ. रहीम शेख, अंजुमआरा शेख, संतोष गायकवाड, तस्लीम पठाण, महेजबीन सय्यद, उमादेवी करली, रूखसाना शेख, शिला शिंदे, जमीर शतरंजीवाले, रूखसाना बागवान, सौ. शाहेदा मंगलुर, शर्मिला परदेशी, राजशेखर नाटीकर, दीपाली बोराळे, वैशाली गोंदकर, अब्दुल अजीज शेख, फिरदोस बडेघर, नफीसा शेख, मुश्ताक शेख, बीबी हाजरा पठाण या सर्वांना लायन्स आयडियल टिचर्स वॉर्ड २०२३ ने सन्मानित करण्यात आले तर क्रिवेटीव्ह टीचर्स ग्रुप वार्ड म्हणून रिजवाना प्यारे, नुरजहाँ बागमरू, महेजबीन शिलेदार, शाहीन शेख, गौसिया होटगी यांना सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुष्पा मुळके, जरमीन मुल्ला व फरजाना शेख यांनी केले तर आभार मुख्याध्यापक रिजवान शेख यांनी मानले.

जि.प.च्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी कामावर रुजू व्हावे

जनतेच्या कामासाठी आंदोलन थांबवा : सीईओ

सुराज्य/सोलापूर

जिल्हा परिषद येथील तोडफोडीच्या प्रकाराबद्दल जिल्हा परिषद अंतर्गत सर्व विभाग तसेच सर्व संवर्ग च्या वतीने ग्रामपंचायत पासून जिल्हा परिषद पर्यंत उत्स्फूर्त पणे काम बंद आंदोलन पुकारण्यात आले होते. आंदोलन स्थगित करून कर्मचारी यांनी कामावर रूजु होणेचे आवाहन जिल्हा परिषेदेच्या

सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले आहे.

जिल्हा परिषदेत आज पत्रकारांनी सिईओ मनिषा आव्हाळे यांची भेट घेऊन त्यांचेशी संवाद साधला. या वेळी त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

या बाबत पत्रकारांशी बोलताना सिईओ आव्हाळे म्हणाल्या, पोलीस प्रशासनाकडून कायद्यानुसार कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थिती मध्ये दुष्काळजन्य परिस्थिती व अन्य प्रशासकीय कामकाजाची सद्यस्थिती पाहता काम बंद आंदोलन चालू ठेवणे उचित होणार नाही. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणून ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांशी आपली बांधीलकी आणि उत्तरदायित्व लक्षात येता मी आपणास आवाहन करते की , आपण काम बंद आंदोलन तात्काळ स्थगित करून आपल्या कार्यालयात उपस्थित राहून नियमित कर्तव्य सेवा बजावण्यात यावी तसेच काम बंद आंदोलनात सहभागी झालेल्या सर्व संवर्गाच्या आणि कर्मचारी संघटनांच्या अधिकारी कर्मचारी यांनी देखील तात्काळ नियमित कामकाजावर हजर राहणे करिता आपले स्तरावरूनआवाहन करण्यात यावे असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले आहेत.

काल कार्यालयाची तोडफोड होऊनही सिईओ मनिषा आव्हाळे यांनी विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांची बैठक घेऊन कामाचा आढावा घेऊन मार्गदर्शन केले होते.

राजपत्रित अधिकारी व कर्मचारी आंदोलन सुरू केलमुळे जनजिवन विस्कळीत होणेचे मार्गांवर असताना सिईओ मनिषा आव्हाळे यांनी आज स्वत: अधिकारी व कर्मचारी यांना मेसेज करून आंदोलन करू नका. लोकांचे कामांना प्राधान्य द्या असे आवाहन केले.उद्या बुधवार पासून कामावर रूजु व्हावे असे आवाहन सिईओ मनिषा आव्हाळे यांनी केले. आज स्वत सिईओ मनिषा आव्हाळे दिवस भर कार्यालयात बसून येणारे अभ्यागत यांना भेटत होत्या.

कोनापुरे चाळ येथे दिव्यांग विवाहितेची आत्महत्या

सोलापूर : रेल्वे लाईन परिसरातील कोनापुरे चाळीत राहणाऱ्या एका २२ वर्षीय दिव्यांग विवाहितेने घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सोमवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. लक्ष्मीबाई चंद्रकांत अत्तरगी (वय २२) असे मयत झालेल्या विवाहितेचे नाव आहे. काल सायंकाळच्या सुमारास घरात कोणी नसताना तिने छताच्या लाकडी वाशाला ओढणीच्या सहाय्याने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मयत लक्ष्मीबाई हिचा पती चंद्रकांत हा देखील दिव्यांग असून तो मजुरीचे काम करतो. या घटनेची नोंद सदर बझार पोलिसात झाली असून या मागचे कारण समजले नाही. हवालदार वाडीकर पुढील तपास करीत आहेत.

उद्योग करू इच्छिणाऱ्यांनी लाभ घ्यावा : सपाटे

शरद बँकेतर्फे अण्णासाहेब पाटील योजनेतून पाच कोटींचे कर्ज वाटप

सुराज्य/सोलापूर

स्वतःची शेती छोटे-मोठे उद्योग व्यवसाय करू इच्छिणाऱ्या मराठा समाजातील तरुण तरुणींनी शरद बँकेतील अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाचा व्याज परतावा कर्जाचा लाभ घ्यावा. असे आवाहन बँकेचे संस्थापक तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले.

शरद नागरी सहकारी बँकेच्या रोप्य महोत्सव वर्षानिमित्ताने बँकेतर्फे अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचा व्याज परतावा कर्ज योजनेत शरद बँकेने पाच कोटी रुपये आत्तापर्यंत कर्जदारांना कर्ज वाटप सपाटे यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते याप्रसंगी सपाटे यांनी येणाऱ्या काळात देखील आपण शरद बँकेच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील आर्थिक महामंडळाच्या माध्यमातून पाचशे तरुणांना या योजनेचा लाभ देणार आहोत. तसेच दुचाकी,चारचाकी,गृहकर्ज, सोने तारण, या योजनेला सुध्दा अल्प व्याजदरामध्ये सर्वांसाठी ही योजना राबवली जात आहे. याचाही लाभ घ्यावा. असे आव्हान

मनोहर सपाटे यांनी केले आहे.

शरद बँकेची नुकतीच वार्षिक सभेमध्ये चेअरमन प्रा महेश माने म्हणाले बँकेच्या रोख्य महोत्सवानिमित्ताने भाग भांडवल वाढण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे. बँकेला चालू वर्षी निव्वळ नफा ६५ लाख रुपये झाला असून दहा टक्के लाभांश गणपती गौरी उत्साहाच्या दरम्यान वाटप करणार आहे.

या सभेला माणिकप्रभू मुळे, मुकुंद जाधव, ज्ञानेश्वर सपाटे, डॉ अनिल बारबोले, शंकर चव्हाण, सुरेश पवार, निलेश उंब्रजकर, दत्ता भोसले, सारंग सपाटे, प्रा नागनाथ नवगिरे, अनिल लोंढे, शिवराम पापळ, एकनाथ घाडगे, महादेव गवळी, भानुदास गंधुरे, विलास झरेकर, संतोष अलकुंटे, तानाजी माने, केशव लोंढे,मोहम्मद शेख, सचिन गायकवाड, सुजाता जुगदार, प्रा मंजुश्री पाटील, अनिता माने, आदी मान्यवर उपस्थित होते,

या सभेचे सूत्रसंचालन बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राजेंद्र अवताडे यांनी केले. तर आभार व्हा.चेअरमन महानंदा सोलापुरे यांनी मानले.

जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत न्यू हायस्कूलचे यश

सोलापूर : उत्तर सोलापुर महानगर पालिका व सोलापुर जिल्हाक्रिडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत विविध गटात खलील विद्यार्थ्यांनी सुयश प्राप्त केले आहे. पुढील प्रमाणे मुले-१४ (३५किलो)- समर्थ विजय भोसले- प्रथम, (३८ किलो) पुरुषोत्तम नरसिंह कुलकर्णी- प्रथम, (३८ किलो) समर्थ बाळू धोडमिसे- द्वितीय, १७ वर्षे मुले (६५ किलो)अरबाज मौलाना मकानदार- तृतीय, समर्थ विजय भोसले व पुरुषोत्तम कुलकर्णी यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली.यशस्वी विद्यार्थ्यांना क्रिडाशिक्षक प्रकाश पवार सर ,वस्ताद- भरत मेकाले, राहुल पोटफोडे यांचे मार्गदर्शन मिळाले.

कर्नाटकातील अवैध गुटखा वाहतूक करणारे चार आरोपी ताब्यात

अक्कलकोट : तालुक्यातील दोड्याळ गावच्या हद्दीत रविवारी गस्त सुरू असताना अन्न व भेसळ अधिकारी व गुन्हे शाखेच्या पोलिसांनी कर्नाटकातील अवैध गुटखा वाहतूक करणाऱ्या चार आरोपींसह स्विफ्ट कार वर थेट कारवाई करून सुमारे ४ लाख ३० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला. अक्कलकोट दक्षिण पोलिस ठाण्यात योगेश विठ्ठल जाधव (वय- २४ वर्षे), पिंटू सिदधण्णा कोळी (वय- २६ वर्षे), बाळकृष्ण दिलीप जाधव (वय- २४ वर्षे), रणजित अमर शिरतोडे (वय २२ वर्षे, सर्व रा. चुंगी, ता. अक्कलकोट) यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपींना १५ दिवसाची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. अन्न व भेसळ अधिकारी रेणुका रमेश पाटील व पोलीस उपनिरीक्षक गुन्हे शाखा सुबोध जमदाडे, सपोफौ. घोळवे, पोहेका कारटकर, पोहेका रवी माने, पोका अजय वायमारे, पोका सूरज रामगुंडे, पोका अन्दर आत्तर यांच्या नेतृत्वा खालील ही मोठी कारवाई असून त्यामुळे गुटखा माफियांना चाप बसला आहे. भेसळ अधिकारी व सोलापूर च्या गुन्हा शाखा पोलीस गस्त घालत असताना त्यांना दोड्याळ हद्दीत शेजारच्या कर्नाटक मधून येणाऱ्या स्विफ्ट कंपनीच्या कारचा (क्र. एम एच ९४बीके२९१४)संशय आला. त्यामुळे कारची तपासणी केली असता कार मध्ये अवैधरित्या मानवी जीवनात अपायकारक ठरणाऱ्या व शासनाने बंदी घातलेला असलेला गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ आढळून आला.

बोरगांवकर-बागेवाडी दांपत्याला मनोरमा आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर



सोलापूर : अक्कलकोट तालुक्यातील कर्जाळ मराठी शाळेतील आदर्श व उपक्रमशील शिक्षिका सुवर्णा बोरगांवकर व दक्षिण सोलापूर तालुक्यातील होटगी गाव कन्नड शाळेतील तंत्रस्नेही, उपक्रमशील शिक्षक राजशेखर बागेवाडी यांना शैक्षणिक क्षेत्रात कष्ट घेऊन आदर्श कार्य केले म्हणून मनोरमा बँक व मनोरमा मल्टिस्टेट सोलापूर यांचेकडून संस्थापक चेअरमन सदाशिवराव मोरे आदर्श शिक्षक म्हणून रविवार दि. १७ रोजी सकाळी ठिक ११.३० वाजता गौरविण्यात येणार आहे. सन २०२३-२४ चा मनोरमा आदर्श शिक्षक पुरस्कारसाठी बोरगांवकर-बागेवाडी या शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या दांपत्याची सार्थ निवड झाल्याबद्दल समाजात सर्वच स्तरातून अभिनंदन होत आहे.

बसपाच्या महासचिवपदी मसलखांब यांची निवड

सोलापूर : बसपा शहर उत्तर विधानसभा मतदार संघातील महासचिव म्हणून जलिंदर मसलखांब यांची निवड केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. यावेली ,बसपा प्रदेश प्रभारी मनीष आनंद, प्रदेश महासचिव अप्पासाहेब लोकरे, जेष्ठ नेते राहुलजी सरवदे, ॲड. संजीवजी सदाफुले , माजी नगरसेवक बबलू गायकवाड, कामगार नेते अशोक जानराव, देवाभाई उपडे,प्रदेश सचिव विलास शेरखाने, जिल्हा अध्यक्ष भालचंद्र कांबले, जिल्हा प्रभारी योगेश गायकवाड, जिल्हा महासचिव अशोक तकतोड़े,अनिल हवले,जनार्दन शिंदे ,अमर सालवे व इतर बसपा कार्यकर्त उपस्थित होते.

गणेश उत्सवात मंडळांनी कायद्याचे पालन करावे

शांतता समिती बैठकीत पोलीस आयुक्तांचे आवाहन

सुराज्य/सोलापूर

गणेशोत्सवात गणेशाचे पावित्र्य राखून आणि कायदा पाळून साजरा करा असे आवाहन पोलीस आयुक्त डॉ. राजेंद्र माने यांनी केले. पोलीस आयुक्तालयात आयोजित शांतता समितीच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकी नंतर गतवर्षी झालेल्या उत्सावातील विजेत्या मंडळांना बक्षिसाचे वितरण करण्यात आले.

प्रारंभी पोलीस उपायुक्त डॉ. दिपाली काळे यांनी प्रास्ताविक केले. गणेशोत्सवामध्ये मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी गणपती उत्सवाचे पावित्र्य राखून आणि पोलीस प्रशासनाकडून देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करून उत्सव साजरा केला पाहिजे. प्रत्येक उत्सव मंडळांनी सिटीजन पोर्टलवर आपल्या मंडळाची नोंदणी करून परवाना ऑनलाईन पध्दतीने येतला पाहिजे, उत्सव साजरा करताना धर्मादाय आयुक्तांकडून परवाना, वीज मंडळाकडून अधिकृतपणे वीज पुरवठा, तसेच स्पिंकरचा परवाना येतला पाहिजे, वर्गणीची सक्ती करू नये, देखावे जनजागृतीपर असावेत, सोशल मिडियावर लक्ष ठेवून अफवांवर विश्वास ठेवू नका या व अन्य अशा काही सूचना उपायुक्त काळे यांनी सांगितले.

त्यानंतर उपस्थित गणेश उत्सव मंडळाच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी काही सूचना मांडल्या महानगर पालिकेच्या वतीने सर्व सोई सुविधा मिरवणुक मार्गावर उपलब्ध करण्यात येतील तसेच काही अडचणी असल्यास त्या सोडवण्यात येतील आणि विसर्जन कुंड तयार करण्यात येत आहेत अशी माहिती अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनी यावेळी सांगितले. मिरवणुकीत सामील होणाऱ्या वाहनांची तपासणी करणे आवश्यक असल्याचे उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या पल्लवी पांडव यांनी सांगितले. सर्व सूचना आणि समस्यांचे निवारण झाल्यानंतर शांतता समितीची बैठक संपन्न झाली. या बैठकीचे सूत्रसंचालन सहाय्यक पोलीस आयुक्त संतोष गायकवाड यांनी केले.

शेवटी मागील वर्षीच्या उत्सावात बक्षिस मिळवलेल्या मंडळांना बक्षिसाचे वितरण करण्यात आले. यामध्ये खालीप्रमाणे बक्षिस वितरण करण्यात आले

सार्वजनिक मध्यवर्ती मंडळ - प्रथम क्रमांक थोरला मंगळवेढा तालीम, द्वितीय पाणीवेस तालीम, तृतीय श्री विश्व विनायक प्रतिष्ठान

लोकमान्य मध्यवर्ती मंडळ - प्रथम क्रमांक कसबा गणपती, द्वितीय पत्रा तालीम, तृतीय क्रांती तालीम निराळे वस्ती

लष्कर मध्यवर्ती मंडळ - गोविंदराज तरूण मंडळ, द्वितीय नवशक्ती तरूण मंडळ, तृतीय जय तिरूपती क्रिडा मंडळ नळबजार

विजापूर नाका व होटगी नाका मध्यवर्ती मंडळ - प्रथम क्रमांक द्वारका नगरी ॲन्ड मेहर नगर गणेशोत्सव मंडळ, द्वितीय विश्वराजा तरूण मंडळ, तृतीय ओम गर्जना युवाशक्ती मंडळ

पूर्व विभाग मध्यवर्ती मंडळ - आप्पा गणपती आंध्रदत्त चौक, द्वितीय एफ जी तरूण मंडळ साईबाबा चौक, तृतीय मानाचा ताता गणपती

विडी घरकुल मध्यवर्ती मंडळ - लक्ष्मीराज गणेशोत्सव महालक्ष्मी चौक जुना विडी घरकुल, द्वितीय मानाचा ताता गणपती पंचमुर्ती आय ग्रुप विडी घरकुल, तृतीय श्री गणेश मित्र मंडळ एच ग्रुप

निलम नगर मध्यवर्ती मंडळ - प्रथम विजयलक्ष्मी तरूण मंडळ, द्वितीय निलमनगरचा राजा, तृतीय इंद्रसेन मित्र मंडळ.

यावेळी पोलीस उपायुक्त अजित बोराडे, विजय कबाडे, सहाय्यक पोलीस आयुक्त प्रांजली सोनवणे यांच्यासह सर्व पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांच्यासह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

सोलापुरात बनल्या हजारो पर्यावरणपूरक गणेशमूर्ती

सुराज्य/सोलापूर

सोलापूर महानगरपालिका अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण, माझी वसुंधरा अभियान व राष्ट्रीय स्वच्छ वायु उपक्रम ची प्रभावी अंमलबजावणी होण्याकरिता तसेच नागरिकांमध्ये पर्यावरणपुरक पद्धतीने सण व उत्सव साजरे होण्याकरिता सोलापूर महानगरपालिका,सोलापूर आणि पर्यावरणपुरक गणेशयुग यांच्या माध्यमातून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याची भव्य दिव्य कार्यशाळा पार पडली.

ही कार्यशाळा सोलापूर येथील राजीव गांधी इनडोर स्टेडीयम येथे झाली असून या कार्यशाळेच्या उद्घाटनास सोलापूर महानगरपालिकेचे उपायुक्त मचिंद्र घोलप हे उपस्थित होते. प्रत्येकाने शाडूमातीच्या गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करायला हवी, मातीच्या बनवलेल्या मुर्त्या पर्यावरणाला हानी पोहचवत नाही, तसेच या गणेश मुर्त्या पाण्यामध्ये लवकर विरघळतात. शाडूच्या मातीची मूर्ती तुम्ही घरच्या घरी बादलीमध्ये सुध्दा विसर्जित करू शकता. ह्यामुळे बाप्पाच्या मूर्ती ची विटंबना टळेल व पर्यावरण देखील सुरक्षित राहील. असा संदेश उपायुक्त मचिंद्र घोलप यांनी दिला. सोलापूर शहरातील जवळपास दीड हजाराच्या वर सर्वच शाळेतील विद्यार्थ्यांचा भरघोस सहभाग होता यावेळी गणेशयुगचे विकास गोसावी यांनी मुलांना पर्यावरण पूरक गणेशमूर्ती बनविण्याचे प्रशिक्षण दिले आणि मुलांनी अतिशय सुंदर कलात्मक गणेशमूर्ती बनविल्या जलप्रदूषण तसेच गणेशाची विसर्जना पश्चात होणारी विटंबना रोखण्यासाठी

पर्यावरणपूरक गणेशोत्सवाची चळवळ घरोघरी रुजावी हा कार्यशाळेचा मुख्य हेतू होता. यावेळी गणेश युग परिवाराचे सचिन जगताप, असावरी गांधी, सोनाली वायमोडे, वैष्णवी जंगम, कोमल पटेल, भूमीषा शहा, रेश्मा गोसावी, बसवराज जमखंडी यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



हत्तुरे वस्ती येथे संत सेना महाराज पुण्यतिथी

सुराज्य/सोलापूर

नाभिक समाजाचे आराध्य दैवत श्री संत सेना महाराज यांची ६५३वी पुण्यतिथी सोहळा होटगी रोड विभागातील हत्तुरे नगर, मजरेवाडी येथील नाभिक समाजाच्या वतीने मातोश्री सिध्दव्वाबाई हत्तुरे सांस्कृतिक भवन येथे साजरी करण्यात आली.

यानिमित्ताने श्री संत रामलू कोंडूर यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्सव समिती अध्यक्ष सिलीसिध्द राऊत यांच्या अध्यक्षतेखाली संत सेना महाराजांना अखिल भाविक वारकरी मंडळ अंतर्गत १४ भजनी मंडळाकडून मंत्रमुग्ध कीर्तन, भजन, गुलालाच्या कार्यक्रम झाला. सुरुवातीला संत सेना महाराजांच्या प्रतिमेची पूजा व आरती माजी परिवहन सभापती विजयकुमार हत्तुरे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी ह.भ.प. दत्तात्रय रामचंद्र शिरसागर व समाजाचे ज्येष्ठ मार्गदर्शक पांडुरंग चौधरी सर, अखिल भाविक वारकरी मंडळाचे अध्यक्ष संजय पवार उपस्थित होते.

सकाळी दहा वाजता ह.भ.प. श्री श्याम मधुकर जोशी महाराज यांचे गुलालाचे कीर्तन झाले. या कार्यक्रमास शिवराम कोरे, भीमाशंकर वारे, शोभाताई राऊत, संजय वायमारे, अमोघसिध्द राऊत, नागराज कोंडूर, सचिन चौधरी,हिंदुराव गोरे, लका ताटे, ललिता कोंडूर, भारती हडपद प्रभाकर राऊत यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

चिमुकल्या हातांनी साकारला लाडका गणपती बाप्पा

आई प्रतिष्ठानतर्फे ह. दे. प्रशालेत गणेशमूर्ती कार्यशाळा

सुराज्य/सोलापूर

शाडूच्या मातीचे गोळे मिळालेले... पण यातून गणपती बाप्पा साकारायचे कसे ? हा प्रश्न सर्वच मुलांना पडलेला.... मात्र प्रशिक्षिका मनाली जाधव यांनी सांगितल्याप्रमाणे शाडूच्या मातीच्या गोळ्याला हळूहळू मुलांनी आकार दिला अन् साकारला सर्वांचा लाडका गणपती बाप्पा. निमित्त होते आई प्रतिष्ठानने हरिभाई देवकरण प्रशालेत आयोजित केलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळेचे.

आई प्रतिष्ठानतर्फे मंगळवारी हरिभाई देवकरण प्रशालेत पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कार्यशाळा झाली. प्रारंभी व्याहाती होम करण्यात आला. या कार्यशाळेचे उद्घाटन शिक्षण प्रसारक मंडळीच्या शाळा समितीचे अध्यक्ष सी.ए. राजेश पटवर्धन यांच्या हस्ते झाले. यावेळी व्यासपीठावर समर्थ सहकारी बँकेचे संचालक प्रशांत बडवे, ह. दे. प्रशालेचे मुख्याध्यापक प्रकाश कांबळे, उद्योजक श्रीकांत कोरडे अमोल गोडबोले, मूर्तिकार नितीन जाधव, आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मोहन डांगरे, सृष्टी डांगरे, प्रशालेचे पर्यवेक्षक हणमंत मोतीबने, कलाशिक्षक श्रीरंग कोरोलीकर, सुहास रत्नपारखी उपस्थित होते.

यावेळी प्रशिक्षिका मनाली जाधव यांनी विद्यार्थ्यांना शाडूच्या मातीपासून गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांनी अतिशय सुरेख गणेशमूर्ती तयार केल्या.

यावेळी आई प्रतिष्ठानचे अध्यक्ष मोहन डांगरे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विकासाला चालना देण्याचे आवाहन केले आहे. त्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत विद्यार्थ्यांमधील कलागुणांना प्रोत्साहन देण्यासाठी आई प्रतिष्ठानतर्फे पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. याप्रसंगी संचालक राहुल डांगरे, संचालक वसंत जाधव, अविनाश शंकू, दादाराव चव्हाण आदी उपस्थित होते.

भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ चे कलम ११ (१) नुसार अधिसूचना

उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर
क्र. २०२२/उभूसं/११/कावि-१/आरआर/४९३
दिनांक-२४/८/२०२३

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाची अधिसूचना क्र.मिस-११/२०१४/सी.आर.७७(पार्ट-२)/ए-२ दि. ११ सप्टेंबर, २०१५ (यास यापुढे सदर अधिसुचना असे संबोधले जाईल) भूमी संपादन पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा वापर करून असे अधिसूचीत केले आहे की, उक्त अधिनियमाच्या कलम ३ (झ, अ) अन्वये सार्वजनिक प्रयोजनार्थ जमिनीच्या संपादनाबाबत १०,००० हेक्टर क्षेत्राच्या मर्यादेपर्यंत भूसंपादना संबंधात, अशा जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी हा उक्त अधिनियमाच्या प्रयोजनासाठी **'समुचित शासन'** असे मानण्यात येईल.

त्याअर्थी, सदर अधिसुचने अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे सचुचित शासन आहे.

त्याअर्थी, परिशिष्ट १ मध्ये नमूद जमिन ही सार्वजनिक प्रयोजनासाठी संपादीत करण्याची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकतो. तसेच सार्वजनिक प्रयोजनाबाबतचे निवेदन परिशिष्ट २ मध्ये करण्यात आले आहे. त्याअर्थी, उक्त कायद्याच्या कलम ११ उपकलम (१) अन्वये अधिसुचीत करण्यात येते की, सार्वजनिक प्रयोजनासाठी सदर जमिन संपादनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासू शकते.

त्याअर्थी, परिशिष्ट ३ मध्ये भूसंपादनामुळे विस्थापित कुटूंबासाठी प्रस्तावित जमिन संपादनाची माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि त्याअर्थी, परिशिष्ट ४ मध्ये सामाजिक आघात निर्धारणाबाबतची संक्षिप्त माहिती विनिर्दिष्ट करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, परिशिष्ट ५ मध्ये सदर कायद्याच्या कलम ४३ उपकलम (१) अन्वये कामकाज पार पाडणाऱ्या प्रशासकाचा तपशिल देण्यात आला आहे.

त्याअर्थी, सदर कायद्याच्या कलम ११ उपकलम ४ अन्वये असे जाहिर करण्यात येते की, सदरची अधिसूचना प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून सदर कायद्याच्या प्रकरण ४ मधील कार्यवाही पुर्ण होईल अशा वेळेपर्यंत कोणतीही व्यक्ती, प्राथमिक अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा व्यवहार / हस्तांतर करणार नाही किंवा अशा जमिनीवर कोणताही बोजा निर्माण करणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११ चे उपकलम ८ व भूमी संपादन पुनर्वसन व पुर्नस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम, २०१३ चे कलम ५० उपकलम ५० अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

परंतु, जिल्हाधिकारी अशा प्रकारे अधिसूचित केलेल्या जमिनीच्या मालकाने अर्ज केल्यावर लेखी नोंदवावयाच्या विशेष परिस्थितीमध्ये या पोटकलमाच्या अंमलबजावणीतून अशा जमिन मालकास सूट देऊ शकेल परंतु आणखी असे की, कोणत्याही व्यक्तीने या तरतुदीचे जाणीवपूर्वक उल्लंघन केल्यामुळे तिला सोसाव्या लागलेल्या कोणत्याही नुकसानीची किंवा क्षतीची जिल्हाधिकाऱ्याद्वारे भरपाई करण्यात येणार नाही.

सदर कायद्याच्या कलम ११चे उपकलम ५ व भूमी संपादन पुनर्वसन व पुनस्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र) नियम २००४ चे कलम ५० उपकलम ३ अन्वये जिल्हाधिकारी विहित करण्यात येईल. त्याप्रमाणे भूमी अभिलेख अद्यावत करण्याचे काम हाती घेईल.

आणि ज्याअर्थी, सदर कायद्याचे कलम ३ उपकलम (ग) अन्वये जिल्हाधिकारी, सोलापूर हे समुचित शासन असल्याने सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर यांना जिल्हाधिकारी यांचे वतीने कामे पार पाडण्यासाठी प्राधिकृत केलेले आहे.

परिशिष्ट १
जमिनीचे वर्णन

अ.क्र.	गावाचे नाव	तालुका	गट नंबर	क्षेत्र	भूसंपादनाचे प्रयोजन
१	घरतवाडी	करमाळा	४९/२, ५०/१, ५१/१	२.२८ हे आर	कृकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील चिलवडी शाखा कालवा, हिंगणी वितरीका, मायनर सा.क.०/००० ते ०/५९० मी.मौजे घरतवाडी ता.करमाळा जिल्हा सोलापूर येथील नियमित भूसंपादन प्रस्ताव बाबत

परिशिष्ट २

प्रकल्पाचे नाव :- कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील चिलवडी शाखा कालवा, हिंगणी वितरीका/ मायनर सा.क्र.०/००० ते ०/५९० मी.

प्रकल्पाचे विवरण :- कुकडी प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील चिलवडी शाखा कालवा, हिंगणी वितरीका/ मायनर सा.क्र.०/००० ते ०/५९० मी.

सामाजिक फायदे :- जलसिंचन (सामाजिक, आर्थिक व इंतर फायदे)

परिशिष्ट ३
पुनर्वसन विधयक बाबीचे विवरण
गावाचे नांव - घरतवाडी तालुका :- करमाळा जि.सोलापूर

अ.क्र.	स.नं.गट नं.	क्षेत्र(हे.आर)
	लागू नाही	

परिशिष्ट ४
सामाजिक आघात निर्धारण अहवालाचा गोषवारा

भूमि संपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ चे कलम १० (क) अन्वये महाराष्ट्र शासन व वन विभाग मंत्रालय, मुंबई यांची अधिसूचना दि. १३ मार्च, २०१५ नुसार उक्त अधिनियमाचे प्रकरण २ व ३ यांच्या तरतुदी लागु करण्यापासून सूट देण्यात आली आहे.

परिशिष्ट ५
प्रशासक नियुक्तीचे विवरण

१) **प्रशासकाचे पदनाम :-** लागू नाही
२) **प्रशासकाचा कार्यालयीन पत्ता :-** लागू नाही
३) **ज्या अधिसुचनेद्वारे प्रशासकाची नियुक्ती केली ते नमूद करावे :-** लागू नाही

सदर अधिसुचनेद्वारे ज्या जमिनीची सार्वजनिक प्रयोजनाची आवश्यकता आहे किंवा आवश्यकता भासण्याचा संभव असल्याचे कायद्याच्या कलम ११ चे उपकलम १ खाली अधिसुचित करण्यात आले आहे. प्रारंभिक अधिसुचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसाच्या आत सक्षम प्राधिकारी तथा **उपजिल्हाधिकारी, भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर** यांचे कार्यालयात आक्षेप नोंदविता येईल.

स्थळ-सोलापूर
दिनांक- २४/८/२०२३

सही/-
(अभिजित पाटील)
सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी,
भूसंपादन क्रमांक ११, सोलापूर

जिमाका/सो/जाहि/१२७/२०२३-२४

नरखेड परिसरातील मराठा बांधवांचे जलसमाधी आंदोलन

सुराज्य/सोलापूर

मनोज जरंगे पाटील यांच्या सुरु असलेल्या आंदोलनाला मोहोळ तालुक्यातील नरखेड परिसरातील मराठा बांधवांनी भोयरे भोगावतीच्या नदीपात्रात जलसमाधी आंदोलन करीत पाठिंबा व्यक्त केला, आरक्षणाची मागणी केली, तसेच यावेळी आंदोलने उग्र करण्याचा इशाराही देण्यात आला.

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी मनोज जरंगे पाटील यांनी. जालना जिल्ह्यातील सराटी येथे मागील पंधरा दिवसापासून आंदोलन सुरू केले आहे.

या आंदोलनाला महाराष्ट्रातून ठिकठिकाणाहून विविध माध्यमातून पाठिंबा मिळत आहे. त्याच अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील भोयरे येथील भोगावती नदीतील बंधाऱ्याच्या पाण्यात मोहोळ तालुक्यातील सकल मराठा समाज बांधवांनी जलसमाधी आंदोलन केले. मराठा आरक्षण मागणीसाठी समाजाने सर्व आंदोलने शांततेत व संयमाने केले आहेत.

परंतु राज्य शासनाने मराठा समाजाच्या संयमाचा अंत पाहू नये. मराठा समाज आरक्षणाची मागणी मान्य केली नाही तर इथून पुढची सर्व आंदोलन उग्र स्वरूपाचे असतील, असा इशारा डिकसळचे माजी सरपंच गोविंद पाटील यांनी यावेळी दिला आहे.

या आंदोलनात विविध मान्यवरांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करीत मराठा समाजाला आरक्षणाची गरज बोलून दाखवली.

यावेळी भोयरेचे सरपंच बालाजी साठे, डिकसळचे माजी सरपंच गोविंद पाटील, सतीश पाटील हणमंत धावणे, बाळासाहेब पाटील, मोहोळ बाजार समितीचे माजी सभापती नागेश साठे, भगवान थिटे, बापू ताकमोगे, महेश पवार, सुदर्शन ढवण,पंडित ढवण, चंद्रहार सिरसट व मोहोळ तालुक्यातील मराठा समाज बांधव उपस्थित होते.

विहिंप बजरंग दलातर्फे कुडलसंगम ते हंजगीपर्यंत पायी कावड यात्रा

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील विश्व हिंदू परिषद बजरंग दलाच्यावतीने श्रावण महिन्याचे औचित्य साधून शिवभक्त हत्तरसंग कुडलसंगम ते हंजगी येथील श्री बमलिंगेश्वर मंदिरपर्यंत पायी कावड यात्रा आयोजित करण्यात आली होती. या कावड यात्रेत हंजगी व परिसरातील शिवभक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. श्रावण महिना हा शिवभक्तासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. या महिन्यात केलेली शिवाची पूजा अत्यंत लाभदायक ठरते, अशी भाविकांची धार्मिक श्रद्धा असल्याने हंजगी येथील विश्व हिंदू परिषद बजरंग दलाचे अनेक कार्यकर्ते श्री भोलेनाथांचा आशीर्वाद घेण्यासाठी हत्तरसंग कुडल संगम येथील पवित्र जल आणून हंजगी येथील श्री बमलिंगेश्वर मंदिरात श्रीलिंगास जलाभिषेक करण्यात आला. तसेच या कावड यात्रेत भाविक उत्साहपूर्वक 'हर हर महादेव' चा जयघोष करीत भगवान शंकराचाही जलाभिषेक करण्यात आला. कावड घेऊन पायी प्रवास करीत कुडलसंगम या पवित्र तीर्थक्षेत्रांचे भरलेले पाणी भगवान शिवालाही अर्पण केले. जलाभिषेक केल्याने महादेव प्रसन्न होऊन भक्तांची इच्छा पूर्ण करत असल्याचे भाविकात श्रध्दा आहे. म्हणून दरवर्षी श्रावण महिन्यात शिवभक्तांकडून कावड यात्रा काढून भगवान शंकराला जलाभिषेक केला जातो.

बोंडले ग्रामपंचायतीच्यावतीने सन्मान

वेळापूर : ग्रामपंचायत बोंडले (ता. माळशिरस) यांच्यावतीने या परिसरातील मान्यवरांचे विविध पदावर निवड झाल्याबद्दल बोंडले ग्रामपंचायतचे सरपंच विजयसिंह माने-देशमुख यांच्या हस्ते तोंडले गावचे नवनाथ कोडग यांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल तसेच जि. प. प्राथमिक शाळा बोंडले अध्यक्षपदी आनंद भीमराव जाधव यांची निवड झाल्याबद्दल त्याचबरोबर उपाध्यक्षपदी नितीन हनुमंत लोंढे, जि. प. शाळा शिंदे वस्ती बोंडले अध्यक्षपदी गणेश बंकट शिंदे निवड झाल्याबद्दल या सर्वांचा निवडीबद्दल सन्मान करण्यात आला. यावेळी बोंडले ग्रामपंचायत उपसरपंच नितीन भानुदास शिंदे, विविध कार्य सोसायटी चेअरमन धनाजी लक्ष्मण जाधव, माजी पंचायत समिती सदस्य भागवत मुरलीधर पाटील, उपसरपंच व रिपाइं आठवले माळशिरस तालुका उपाध्यक्ष महेंद्र शहाजी लोंढे, व्यसनमुक्ती अध्यक्ष काकासाहेब माने-देशमुख, भालचंद्र पाटील, हनुमंत शिंदे आदी उपस्थित होते.

माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेची सर्वसाधारण सभा

लोणकर, दिवटे यांना सन्मानपत्र प्रदान

सुराज्य/वेळापूर

तालुक्यातील कर्मचाऱ्यांची सर्वात मोठी पतसंस्था असणाऱ्या माळशिरस तालुका शिक्षक पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा भगवंत मंगल कार्यालय पुरंदावडे येथे रविवारी १० सप्टेंबर रोजी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेऊन पार पडली. यावेळी स्वाभिमानी शिक्षक परिवाराचे नेते, विविध शिक्षक संघटनांचे राज्य, जिल्हा व तालुका प्रतिनिधी,महिला आयाडी पदाधिकारी, संस्थेचे माजी अध्यक्ष उपस्थित होते.

पतसंस्थेचे अध्यक्ष आप्पा खरात यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या सभेमध्ये संस्थेच्या दीर्घकालीन धोरणाचे सूतोवाच करण्यात आले. सेवानिवृत्त शिक्षकांना नाममात्र सभासद करून ठेवी स्वीकारणे, अल्पमुदतीच्या व दीर्घ मुदतीच्या ठेवीच्या योजना राबविणे, शतक महोत्सवी ठेवीच्या विशेष लाभाच्या योजना राबवणे यासह कर्जमर्यादा वाढ, संस्थेचे संपूर्ण संगणकीकरण अशा अनेक विषयांवर बहुमताने निर्णय घेतले गेले. विषय वाचनावेळी सभासदांनी विचारलेल्या प्रश्नांना संस्थेच्यावतीने आप्पा खरात, अशोक पवार, विजय शिंदे आणि इतर संचालकांनी समर्पक उत्तरे दिली.

संस्थेच्यावतीने कर्तुत्व सिद्ध उपक्रमशील शिक्षक समीर लोणकर आणि संस्थेची गेली ४५ वर्षे सातत्याने सचिव म्हणून सेवा करणाऱ्या सतेज दिवटे यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. तसेच सोळा कर्तुत्व संपन्न शिक्षकांना सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील गुणवंत शिक्षक पुरस्काराने गौरवण्यात आले. सभा पार पाडण्यासाठी संस्थेचे व्हाईस चेअरमन अण्णा मगर, संचालक अशोक पवार, विजय शिंदे, राजेंद्र उकिरडे, रामकृष्ण काटकर, पांडुरंग मोहिते, आत्माराम गायकवाड, ज्ञानेश्वर मिसाळ, अमोल नष्टे, विलास जगदाळे, पोपट भोसले, दमयंती मांडवे, शहादबी मुल्ला सहसचिव बलभीम नवले यांनी योगदान दिले.

पाच ठिकाणी वाढीव ट्रान्सफॉर्मर बसवण्याचे व ३३/११ केव्हीची सबस्टेशन्स उभारण्याचे आदेश

सुराज्य/टेंभुर्णी

माढा विधानसभा मतदारसंघातील पडसाळी, अरण, भेंड, वरवडे व परिते या ठिकाणी वाढीव ट्रान्सफॉर्मर्स बसवण्यासाठी तसेच माढा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या माढा तालुक्यातील जाधववाडी (मो.), बैरागवाडी, घोटी व बावी, पंढरपूर तालुक्यातील चिलाईवाडी व माळशिरस तालुक्यातील जांबूड या गावी नवीन ३३/११ केव्हीचे सबस्टेशन होण्यासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्याकडे प्रस्ताव सादर करून, मागणीसाठी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे वीज मंडळाच्या या कामांना शासनातर्फे मंजुरी मिळाली असल्याची माहिती आमदार बबनदादा शिंदे यांनी दिली आहे.

अधिक माहिती देताना आ. बबनदादा शिंदे म्हणाले की, 'माढा विधानसभा मतदारसंघात विजेची समस्या असून शेतकऱ्यांना नियमित व पुरेशा दाबाने वीज पुरवठा होण्यासाठी माढा मतदारसंघातील पडसाळी, अरण, भेंड, वरवडे व परिते या पाच ठिकाणी असलेल्या विद्युत सबस्टेशनमध्ये ५ एमव्हीएचे नवीन ट्रान्सफॉर्मर्स बसवून मिळावेत म्हणजे संबंधित गाव व परिसरातील इतर गावांना योग्य व पुरेशा दाबाने वीज पुरवठा होईल. त्याचप्रमाणे माढा मतदारसंघातील माळशिरस तालुक्यातील जांबूड, पंढरपूर तालुक्यातील चिलाईवाडी व माढा तालुक्यातील जाधववाडी (मो.)/ बैरागवाडी, घोटी व बावी अशा एकूण पाच गावी ३३/११ केव्हीच्या नवीन सबस्टेशनची उभारणी व्हावी यासाठी उपमुख्यमंत्री नामदार अजितदादा पवार यांच्याकडे प्रस्ताव सादर केला होता. उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांनी प्रमुख वरिष्ठ अधिकारी व सोलापूर जिल्ह्यातील वीज मंडळाच्या अधिकाऱ्यासमवेत मुंबई मंत्रालयात नुकतीच बैठक घेतली व माढा विधानसभा मतदारसंघातील पाच गावी पाच एमव्हीएचे वाढीव ट्रान्सफॉर्मर्स बसवण्याचे व मतदार संघातील पाच गावी नवीन ३३/११ केव्हीचे सबस्टेशन्स उभारण्याचे निर्देश/आदेश दिले असल्याची माहिती आमदार बबनदादा शिंदे यांनी दिली आहे.

या बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रधान सचिव आशिष शर्मा, ऊर्जा विभागाच्या प्रधान सचिव आभा शुक्ला, महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्रा, मुख्य अभियंता प्रवीण परदेशी व बारामती सोलापूर व बार्शी या ठिकाणचे वीज मंडळाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

शिक्षिका शितल मेनकुदळे-कोल्हे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

पिलीव : माळशिरस तालुक्यातील बचेरी येथील शिक्षिका शितल मेनकुदळे कोल्हे यांना माळशिरस तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेचा आदर्श शिक्षक पुरस्कार नुकताच प्रदान करण्यात आला. शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार देणयात आला. शितल कोल्हे यांना हा पुरस्कारप्राप्त झाल्याबद्दल माळशिरस पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी धनंजय देशमुख, विस्तार अधिकारी करडे, केंद्रप्रमुख, बचेरीच्या सरपंच राणी गोरड, उपसरपंच बरकडे, शाळा व्यवस्थापन समितीच्यावतीने शितल मेनकुदळे-कोल्हे अभिनंदन व कौतुक केले जात आहे.

तोडफोड प्रकरणात चौघा आरोपींना न्यायालयीन कोठडी

सोलापूर : सोलापूर जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या कार्यालयातील तोडफोड प्रकरणी ४ आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी देण्यात आली.

या घटनेच्या हकीकत असे की,शरणप्पा शिवराय हांडे (रा.सोलापूर),अंकुश केरप्पा गरांडे,धनाजी विष्णू गडदे (दोघे रा.मंगळवेढा),सोमनिंग घोडके (रा.अक्कलकोट) यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनाची तोडफोड केल्याप्रकरणीच्या गुन्ह्याकामी त्यांना सोमवारी सदर बझार पोलिसांनी अटक करून न्यायाधीश एस.एन. रतकंठवार यांचे समोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने चारही आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली. बिंदू नामावलीनुसार धनगर समाजाच्या साडेतीन टक्के आरक्षणाप्रमाणे शिक्षक भरती करावी,या प्रमुख मागणीसाठी जिल्हा परिषदेत धनगर समाजाच्या कार्यकर्त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांच्या दालनाची तोडफोड केल्याने गुन्हा दाखल करण्यात आला होता. यात आरोपी तर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड.श्रीपाद देशक, ॲड.सिध्दाराम पाटील तर सरकारतर्फे ॲड.अमर डोके यांनी काम पाहिले.

कॉलेज ऑफ नर्सिंग येथे नवप्रवेशित विद्यार्थ्यांना शपथविधी

सुराज्य/बार्शी

बार्शी रूग्णांच्या आरोग्याची देखभाल करण्याच्या दृष्टीकोनातून परिचर्या यांचे कार्य महत्वपूर्ण आहे. परिचर्या यांच्या अंगी सहनशीलता, नम्रता आणि प्रामाणिकपणा हे गुण आवश्यक आहे, असे प्रतिपादन प्रजापिता ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अनिता करवा यांनी केले. येथील कॉलेज ऑफ नर्सिंग येथे नवीन प्रवेशित बीएसस्सी नर्सिंग, जीएनएम, एएनएम कोर्सच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचा दीप प्रज्वलन आणि शपथविधी सोहळा झाला, त्यावेळी त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष डॉ. बी. वाय. यादव होते तर सचिव पी. टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, महाविद्यालयाच्या प्राचार्या सुरेखा डांगरे आदी उपस्थित होते. यावेळी नर्सिंग कॉलेजमधील नवप्रवेशित विदयार्थ्यांनी दीपप्रज्वलन करून शपथ घेतली. सूत्रसंचालन नवीन बुरला व भाग्यश्री गवळी यांनी केले. राजश्री गवळी यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. आभार अक्षय दुधे यांनी केले.

श्री शिवचलेश्वर पालखी महोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रम

सुराज्य/अक्कलकोट

अक्कलकोट तालुक्यातील मैदर्गी येथील ग्रामदैवत श्री शिवचलेश्वर पालखी महोत्सवानिम्मीत मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामदैवत श्री शिवचलेश्वर पालखी महोत्सव दरवर्षीप्रमाणे यंदाही उत्तरा नक्षत्राच्या पहिल्या गुरुवारी दि.१४ सप्टेंबर गुरुवार रोजी पालखी महोत्सव होणार असून या पालखी महोत्सवानिमित्त मंदिरात श्रावण महिन्यापासून रोज पहाटे 'श्री'स रुद्राभिषेक तसेच पानपुजा धार्मिक कार्यक्रमाबरोबरच दि.१ सप्टेंबर पासून मंदिरात रोज सायं. ८ वा. श्री शिवचलेश्वर महात्मे आधारीत श्री वेदमूर्ती, संगव्या शास्त्री हिरेमठ यांच्या अमृतवाणीने पुराण प्रवचन चालू आहे. मंदिरात रविवार रोजी मंदिरात हेडगी जत्रा पार पडले आहे. मंगळवार दि. १२ मंगळवार रोजी सायं. ८ वा. एम. एस. युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश शावरी यांच्यावतीने शहरातील हजारो महिला सुवासिनींना ओटी भरण्याचे कार्यक्रम संपन्न झाला आहे आणि रात्री आठ वाजता ओटी भरणे व पुराण मंगलमहोत्सवासाठी आलेल्या सर्व भक्तांना युवा उद्योजक सुरेश नागुर यांच्यावतीने तूप, करंज्या, पोळीचे महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. दि. २६ सप्टेंबर मंगळवार रोजी अन्नी महोत्सव होणार आहे तसेच दि. १४ सप्टेंबर गुरुवार रोजी सकाळी ८.३० वाजता मंदिरातून पालखी मिरवणुकीला सुरुवात होऊन शहराच्या प्रमुख मार्गाने मिरवणूक निघणार असून या सोहळ्यात शहरातील विविध चौकातील तरुण मंडळाचे कार्यकर्ते लेझीम टिपरी, ढोल, भजन संघ, नृत्य संघ सहभागी होणार आहेत. या पालखी महोत्सवात भक्तगणांनी सहभागी होण्याचे आव्हान देवस्थान पंच कमिटीने केले आहे.

या पालखी महोत्सवानिमित्त मैंदर्गीस शहरातील विविध क्षेत्रात कार्य करणारे छत्रपती प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश गोब्बुर, जि. प. प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेचे मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी, एम. एस. युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष महेश शावरी तसेच दहावी आणि बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला आहे.

सुळेवाडी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी कुंडलिक माने यांची निवड

पिलीव : माळशिरस तालुक्यातील सुळेवाडी येथील जिल्हा परीषद प्राथमिक शाळेच्या शाळा व्यवस्थापन समिती पुनर्गठन करण्यात आली. यावेळी समितीच्या अध्यक्षपदी कुंडलिक ईश्वर माने यांची तर उपाध्यक्षपदी उमाजी बोडरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी सदस्य म्हणून प्राजक्ता सोलंकर, अर्चना ढेरे, दिपाली सुळे, वंदना लोखंडे, मनीषा माने, मनीषा जयवंत सुळे, शरद दोलताडे, रामचंद्र सुळे, सुभाष सुळे, राजेंद्र सुळे, बाजीराव सुळे, धनाजी बोडरे, विद्या ऐवळे यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या तर शिक्षक प्रतिनिधी म्हणून छाया गोटे, सचिव बाबासाहेब धोत्रे यांच्या बिनविरोध निवडी करण्यात आल्या. या निवडीच्या वेळी युवा नेते विक्रम सुळे व नाथा सोलंकर उपस्थित होते. नूतन अध्यक्ष, उपाध्यक्ष व सदस्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला.

उजनी धरणग्रस्तांची जमिनी परत करण्याची मागणी

सुराज्य/उत्तर सोलापूर

उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील २५ ते ३० शेतकऱ्यांनी जमिनी उजनी धरण ग्रस्तासाठी अधिग्रहण करण्यात आल्या आहेत. आजपर्यंत कोणताही प्रकारचा मोबदला देण्यात आला नसल्याने आमच्या जमिनी आम्हाला परत कराव्यात, अशी मागणी शेतकऱ्यांच्यावतीने भिवा वावरे यांनी जिल्हा अधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

बेलाटी येथील २५ ते ३०, पंढरपूर येथील जवळपास ४० ते पन्नास, उत्तरमधील इतर गावातील शेतकऱ्याची जमिनी १९७५ साली घेण्यात आली आहेत. सदरची जमिनी व्यवसायिक, एजंटनी परस्पर शेतकऱ्यांना माहिती न होताच विक्री केल्या आहेत.जमिनी परत मिळावी म्हणून तक्रार केल्यास संबधित सलगरवस्ती पोलीस ठाण्यातील पीआय, अधिकारी व पोलीस दमदाटी करत आहेत.

एक मोबदला द्या नाहीतर आमच्या जमिनी आम्हाला परत करा, अशी मागणी केली आहे. यावेळी पप्पू सुतार, शिवाजी सोनटक्के, राजकुमार पाटील, भिवा वावरे, राजू पोखरकर, रावसाहेब पाटील, रसिकांत पाटील, हरिदास हणचीकट्टी यांच्यासह शेतकरी उपस्थित होते.

माजी सैनिक बाबासाहेब गायकवाड यांचे निधन

श्रीपूर : ता. माळशिरस येथील माजी सैनिक व कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक पांडुरंग सहकारी साखर कारखान्याचे सेवानिवृत्त कर्मचारी बाबासाहेब गायकवाड यांचे वयाच्या ८१व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. श्रीपूर येथील डॉ. भारत गायकवाड यांचे ते वडील होत.

श्रीनिवास गोरंटला यांचे निधन

सोलापूर : जुना विडी आय ग्रुप येतील रहिवाशी श्रीनिवास गोरंटला यांचे दि. ११ सप्टेंबर २०२३ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात ३ मुले १ मुलगी व सून आणि नातवंड असा परिवार आहे.

कुडूवाडी न. प. च्या आठ कर्मचाऱ्यांना बजावली नोटीस

अचानक भेट देऊन कारभारावर ओढले ताशेरे

सुराज्य/कुडूवाडी

कुडूवाडी नगरपालिकेच्या कारभाराबाबत नागरिकांच्या वाढत्या तक्रारींची दखल घेऊन प्रांताधिकारी प्रियंका आंबेकर यांनी नगरपालिकेला अचानक भेट देताच कर्मचाऱ्यांची एक धांदल उडाली व फोनाफोनी सुरू झाली. कार्यालयीन हजेरी मस्टर घेऊन तपासणी केली असता. विना परवानगी गैरहजर असणाऱ्या व उशिरा कार्यालयात येणाऱ्या संबंधित आठ कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत यापुढे अशा चुका खपवून घेतल्या जाणार नाहीत अन्यथा कारवाई केली जाईल, अशी सक्त ताकीद कर्मचाऱ्यांना देण्यात आली.

याबाबत प्रांताधिकारी यांना बाबत विचारले असता पावसाळ्यामुळे पाणीपुरवठा गढूळ होत असल्याने त्याचे योग्य पद्धतीने निर्जंतुकीकरण करून पाणीपुरवठा करण्यासाठी, शहराला भेडसावत असणाऱ्या आरोग्य समस्या लक्षात घेता शहरातील स्वच्छता व फवारणी पूर्ण करण्यात येईल, शहरातील अतिक्रमणाची पाहाणी करण्यात येईल. याचबरोबर संथ गतीने सुरू असलेल्या रस्ते रुंदीकरणाची माहिती घेऊन त्यासंदर्भातील अडचणी दूर करून शहरातील रस्ते पूर्ण करण्यात येणार असल्याचे प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर यांनी सांगितले.

काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवामुळे शहरातील मिरवणूक मार्गावरील रस्त्यांमधील खड्डे व कमी उंचीवर असणाऱ्या विद्युत तारा यांची पाहाणी करून योग्य ती उपाययोजना करणार. शहरातील नागरिकांनी व गणेश मंडळांनी पर्यावरणपूर्वक समाजप्रबोधनपर देखावे साजरे करावेत, असे आवाहन प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर यांनी केले.

राज्य शासनाने सिंगल युज वापर असणाऱ्या प्लॅस्टिक पिशव्यांवर बंदी घातली असून नागरिकांनी व व्यापाऱ्यांनी प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर टाळण्याचे आवाहन केले.

महत्त्वाचे वृत्त...

भांडण सोडवायला गेलेल्या पोलिसांना मारहाण

मुंबई : दोन गटांमध्ये सुरू असलेले भांडण सोडवण्यासाठी गेलेल्या पोलीस पथकाला मारहाण करण्यात आल्याचा प्रकार सोमवारी मालाड परिसरात घडला. घटनास्थळी पोहोचल्यावर दोन गटांमध्ये मारामारी सुरू होती. त्यामुळे पोलिसांनी त्यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला असता त्यातील सूरज नावाच्या व्यक्तीने पोलिसांना धक्काबुक्की केली. त्यावेळी एका अनोळखी महिलेनेही पोलिसांना मारहाण केली. याप्रकरणी सूरज प्रसाद, यास्मिन प्रसाद, राज कशाळकर, योगेश कशाळकर व योजना कशाळकर यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. पोलिसांना मारहाण व सरकारी कामात अडथळा निर्माण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून या पाच जणांना अटक करण्यात आली.

'फेरीवाला' याचा अर्थ कुठेही दुकान थाटा असा नाही

मुंबई : पदपथांवर बेकायदा फेरीवाले अतिक्रमण करत असल्याने पादचाऱ्यांना जीव धोक्यात घालून रस्त्यावरून चालावे लागते. फेरीवाला धोरणाचा अर्थ कुठेही व्यवसाय करावा किंवा दुकान थाटावे असा होत नाही, अशा शब्दात उच्च न्यायालयाने पदपथांवरील बेकायदा फेरीवाल्यांबाबत सोमवारी टिप्पणी केली. तसेच अंधेरी पश्चिमेकडील चार बंगला परिसरातील सेंट लुईस मार्गावरील बेकायदा दुकानदारांना महापालिकेच्या कारवाईपासून दिलासा देण्यास नकार दिला. अंधेरीतील पदपथावर चार दशकांहून अधिक काळ व्यवसाय करत असल्याचा दावा करून या फेरीवाल्यांनी महानगरपालिकेने सुरू केलेल्या कारवाईविरोधात उच्च न्यायालयात धाव घेतली होती.

एसटी कर्मचाऱ्यांचे उपोषण मागे

मुंबई : प्रलंबित मागण्यांसाठी एसटी कर्मचारी संघटनेच्या नेतृत्वाखाली कर्मचाऱ्यांनी सोमवारी मुंबईतील आझाद मैदानात बेमुदत उपोषण सुरू केले होते. आंदोलनामुळे ऐन गणेशोत्सवाच्या तोंडावर एसटी सेवा ठप्प होऊन नागरिकांचे अतोनात हाल होण्याची चिन्हे निर्माण झाली होती. दरम्यान, उद्योगमंत्री उदय सामंत यांनी महागाई भत्त्यासह इतर मागण्यांची पूर्तता करण्याचे आश्वासन दिल्यामुळे एसटी कर्मचारी संघटनेने उपोषण मागे घेतले. तसेच १३ सप्टेंबर रोजी करण्यात येणारे राज्यव्यापी बेमुदत उपोषण स्थगित करण्यात आले.

एड्स जनजागृतीसाठी क्यूआर कोड

मुंबई : एड्स म्हणजे एचआयव्हीबाबत नागरिकांमध्ये अद्यापही अनेक गैरसमज आहेत. त्यामुळे त्याबाबत जनजागृती, वैद्यकीय तपासणी, उपचार आदींची माहिती सहज उपलब्ध व्हावी यासाठी मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीने एक विशेष क्यूआर कोड तयार केला आहे. हा क्यूआर कोड स्कॅन करताच नागरिकांना एड्ससंदर्भातील सर्व माहिती मोबाइलवर उपलब्ध होणार आहे. एचआयव्ही, एड्सबाबतचा संपूर्ण तपशिल, वैद्यकीय तपासणी, उपचार आदींबाबतची माहिती नागरिकांना सहज उपलब्ध व्हावी, त्यांच्या मनातील आजाराबाबतचे गैरसमजही दूर व्हावे या अनुषंगाने मुंबई जिल्हा एड्स नियंत्रण सोसायटीने 'एमडॅक्स एचआयव्ही केअर' हे क्यूआर कोड तयार केले आहे.

हॉटेल व्यवसायातील मुलाचे अपहरण

पुणे : हॉटेल व्यवसाय सुरू करण्यासाठी पैसे हवे असल्याने भंगार विक्रेतेच्या मुलाचे अपहरण केल्याची धक्कादायक घटना उजेडात आली असून अवघ्या अडीच तासात आरोपींना जेरबंद करण्यात पिंपरी-चिंचवडच्या गुन्हे शाखा युनिट चारला यश आले आहे. आरोपींकडून एक पिस्तूल, कोयता, तलवार आणि मोबाइल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तेजस ज्ञानोबा लोखंडे, अर्जुन सुरेश राठोड आणि विकास संजय मस्के अशी अटक करण्यात आलेले आरोपींची नावे असून त्यांनी अल्पवयीन १४ वर्षीय मुलाचे अपहरण करून तीस लाखांची खंडणी मागितली होती.

वैद्यकीय महाविद्यालयात खंडणीची मागणी

ठाणे : नेरुळ येथील एका नामांकित वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवून देतो असे सांगून मध्यस्थांचे अपहरण करून त्यांच्या कुटुंबियांकडून सुमारे ५० हजार रुपयांची खंडणी उकळल्याप्रकरणी काँग्रेसच्या विद्यार्थी संघटनेच्या ठाणे शहराध्यक्षासह पाच जणांविरोधात कापूरबावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मनोरमानगर येथील जयेश पटेल याबाबत पोलिसात तक्रार दिली. याप्रकरणी विद्यार्थी काँग्रेसचे ठाणे शहराध्यक्ष प्रथमेश यादव, अजित ओझा, पवनुमार मिश्रा, विनीत तिवारी आणि विष्णु यादगे यांच्याविरुध्द पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बहिणीला त्रास देणाऱ्या मेहुण्याचा खून

पुणे : बहिणीला त्रास देणाऱ्या मेहुण्याच्या डोक्यात गज मारुन खून करण्यात आल्याची घटना बाणेर भागात मंगळवारी घडली. मेहुण्याचा खून केल्यानंतर तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केली. धनंजय साडेकर (वय ३८) असे खून झालेल्याचे नाव आहे. साडेकर यांचा खून केल्यानंतर हेमंत काजळे (वय ४०) याने गळफास घेऊन आत्महत्या केली. बाणेरमधील श्री समृध्दी सोसायटीत ही घटना घडली. धनंजय साडेकर यांचा हेमंत काजळे याच्या बहिणीशी विवाह झाला होता. विवाहानंतर साडेकर दाम्पत्यात वाद झाले. मंगळवारी दुपारी काजळेने साडेकर यांना जाब विचारला. त्यांच्यात वाद झाला, त्यातून हा खून झाला.

ब्रॅण्डेड कपडे मागविले अन् हाती आल्या चिंध्या

पुणे : नामांकित कंपन्यांचे कपडे स्वस्तात घेण्याचा मोह चंदनगरमधील एका महिलेच्या अंगलट आला. महिलेला स्वस्तात कपडे देण्याच्या आमिषाने चोरट्यांनी खोक्यातून चिंध्या पाठवल्याचा प्रकार उघडकीस आला. याबाबत एका महिलेने चंदननगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. तक्रारदार महिलेचा कपडे विक्री व्यवसाय आहे. चोरट्यांनी महिलेच्या मोबाइलवर संपर्क साधला. नामांकित कंपन्याचे कपडे स्वस्तात देण्याचे आमिष चोरट्याने महिलेला दाखविले. बाजारभावापेक्षा कमी किमतीत कपडे मिळत असल्याने महिलेने चोरट्याला ऑनलाइन पध्दतीने तीन लाख रुपये पाठविले. चोरट्याने महिलेला खोक्यातून कपडे पाठविले आहेत, अशी बतावणी केली. महिलेच्या घरी खोके आले. तिने खोके उघडले. तेव्हा खोक्यात कपड्यांऐवजी चिंध्या आढळून आल्या. चंदननगर पोलिसांकडून याप्रकरणाचा तपास करण्यात येत आहे

उपोषण मंडपातच तरुणाने केले विषप्राशन

यवतमाळ : उमरखेड येथे गेल्या सात दिवसांपासून मराठा आरक्षणासाठी सुरू असलेल्या उपोषण मंडपात आरक्षणाची मागणी करत एका तरुणाने विष प्राशन केल्याने खळबळ उडाली. ही घटना मंगळवारी दुपारी घडली. अशोक देवराव जाधव (३५, रा. जेवली, ता उमरखेड) असे या तरुणाचे नाव आहे. त्याच्यावर यवतमाळ येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचार सुरू आहेत. या घटनेने मराठा आरक्षणासाठी जिल्ह्यात सुरू असलेल्या आंदोलनास गालबोट लागले. उपोषणाला समर्थन देण्यासाठी तालुक्यातील अनेक गावातील मराठा समाजबांधव व भगिनी दररोज उपोषण मंडपात भेट देत आहेत. मंगळवारी काही जण मार्गदर्शन करीत असताना तालुक्यातील जेवली येथील अशोक जाधव हा तरुण उपोषणकर्त्यांसोबत बोलण्यासाठी मंडपात गेला व आरक्षणाची मागणी करीत त्याच ठिकाणी बसून त्याने खिशातील कीटकनाशकाची बाटली काढून त्यातील विषारी औषध प्यायले.

निवृत्त पोलीस अधिकाऱ्याची दीड कोटींची फसवणूक

सुराज्य/पुणे

निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यास व्यवसायात गुंतवणुकीचे आमिष दाखवून एक कोटी ५५ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी चतु:शृंगी पोलिसांनी पाचजणांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

राजेश वसंतराव कारंडे (वय ७५), लिना राजेश कारंडे, अपर्णा निलेश कारंडे, लता वसंतराव कारांडे (सर्व रा. शिवाजीनगर) अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याबाबत निवृत्त वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने चतु:शृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा वर्षांपूर्वी निवृत्त पोलीस अधिकाऱ्याला आरोपींनी कास फुटवेअर प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत गुंतवणुकीचे आमिष दाखविले होते. त्यानंतर तक्रारदार अधिकाऱ्याने वेळोवेळी आरोपींना एक कोटी ५५ लाख रुपये दिले. आरोपींनी त्यांना कंपनीतील समभागांचे प्रमाणपत्र दिले होते. आरोपींनी करारनामा केला. आरोपींनी कराराचा भंग करुन पोलीस अधिकाऱ्याची फसवणूक केली. सहायक पोलीस निरीक्षक जानकर तपास करत आहेत.

गोव्यात विद्यार्थ्यांच्या धर्मांतराचा प्रयत्न; विहिंपकडून तक्रार

सुराज्य/गोवा

मुख्याध्यापकावर कारवाई

इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांना मशिदीत येऊन गेल्याप्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापकाचं निलंबन करण्यात आल्याची घटना गोव्यात घडली आहे. विद्यार्थ्यांना मशिदीत नेल्यानंतर त्यांना धार्मिक विधि करण्यास प्रवृत्त करण्यात आल्याची तक्रार करण्यात आल्यानंतर ही कारवाई करण्यात आली.

दक्षिण गोव्यातील अल्टो-दाबोलिम येथील केशव स्मृती उच्च माध्यमिक विद्यालयातील या खाजगी शाळेच्या मुख्याध्यापकाने शनिवारी एका शिबिरासाठी इयत्ता अकरावी विद्यार्थ्यांच्या एका गटाला मशिदीत नेले आणि त्यांना धार्मिक विधी करण्यास प्रवृत्त केल्याची तक्रार करण्यात आली आहे.

तसेच, सोमवारी, विश्व हिंदू परिषदेच्या (व्हीएचपी) सदस्यांनी शाळेच्या मुख्याध्यापकांविरुध्द देशविरोधी कारवायांचे समर्थन केल्याबद्दल वास्को येथे पोलीस तक्रार दाखल केली. ही कार्यशाळा प्रतिबंधित पॉप्युलर फ्रंटशी संलग्न संघटनेच्या निमंत्रणावरून आयोजित करण्यात आली होती, असा दावाही विहिंपने केला आहे.

खासदार नुसरत जहाँ ईडी कार्यालयात दाखल

सुराज्य/नवी दिल्ली

पश्चिम बंगालच्या तृणमूल काँग्रेसच्या खासदार नुसरत जहाँ यांची ईडीकडून चौकशी सुरु झाली आहे. कोलकाता येथील ईडी कार्यालयात नुसरत जहाँ काही वेळापूर्वीच पोहचल्या आहेत. तिथे त्यांची चौकशी करण्यात येते आहेत. सॉल्ट लेक भागातील सीजीओ कॉम्प्लेक्स या ठिकाणी असलेल्या कार्यालयात नुसरत जहाँ यांची चौकशी करण्यात येते आहे. शहरातल्या न्यू टाऊन या ठिकाणी घर देण्याचं आश्वासन देऊन ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक केल्याचं हे प्रकरण आहे. याआधी ५ सप्टेंबर रोजी नुसरत जहाँ या ईडीसमोर हजर झाल्या होत्या.

ईडीने नुसरत जहाँ यांना चौकशीसाठी हजर राहण्यासंबंधी बजावण्यात आलं होतं. त्यानुसार आज नुसरत जहाँ चौकशीसाठी उपस्थित झाल्या आहेत. नुसरत जहाँ या अभिनेत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या खासदार आहेत.

गेल्या दीड वर्षात ३ लाख तरूणांना रोजगार दिला

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा दावा

मुंबई : कौशल्य विकास विभागाच्या माध्यमातून गेल्या दीड वर्षांमध्ये तीन लाख उमेदवारांना रोजगार प्राप्त झाला आहे, असा दावा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केला आहे. भारत युवा देश म्हणून ओळखला जातो. युवकांना कौशल्य विकासाच्या, रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचेही ते म्हणाले.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागांतर्गत ४१८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील अभ्यासिकांच्या वर्गांचे ऑनलाईन उद्घाटन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे बोलत होते. कौशल्य, रोजगार विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रकाश सुर्वे, अपर मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, कौशल्य विकास आयुक्त डॉ. रामास्वामी एन यांच्यासह ४१८ औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे प्राचार्य व विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, आज चाळीस हजार विद्यार्थी ऑनलाईन उपस्थित आहेत, त्या सर्वांचे मी खूप खूप अभिनंदन करतो. नव्याने सुरू झालेल्या ७५ आभासी क्लासरूम आणि आज सुरू झालेल्या अभ्यासिका यांचा विद्यार्थी लाभ घेवून स्वविकास करतील, अशी मला आशा आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्किल इंडिया व डिजिटल इंडियाला प्रोत्साहन दिले असून, देशात विविध योजना राबविल्या जात आहेत. याच धर्तीवर राज्यात देखील कौशल्य विकास विभागामार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या नेतृत्वामध्ये गेल्या दीड वर्षांमध्ये तीन लाख तरूणांना रोजगार प्राप्त झाला असून, कौशल्य विकास प्राप्त युवकांना भविष्यातही रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. उद्योजकतेला लागणारे नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान लक्षात येऊन आयटीआयमध्ये विविध ९०० कोर्सेस शिकवले जातात, ही अभिमानाची गोष्ट असल्याचे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितले.

सौदीच्या वक्तव्याने पाकिस्तानचे टेन्शन वाढले

सुराज्य/नवी दिल्ली

सौदी अरेबियाचे राजकुमार मोहम्मद बिन सलमान यांनी नवी दिल्लीत आयोजित जी-२० शिखर परिषदेला हजेरी लावली. यावेळी त्यांनी भारताकडून मिळालेल्या आदरातिथ्याल प्रत्यत्तर म्हणून असे वक्तव्य केले ज्याने पाकिस्तानचे टेंशन वाढले आहे. मोहम्मद बिन सलमान यांनी पाकिस्तानचे नाव न घेता वक्तव्य केले की, देशांना त्यांच्या देशात दहशतवादाला आश्रय देणे बंद करावे लागेल. त्यांना अशा सर्व संघटना संपवाव्या लागतील. याशिवाय दोषींना लवकरात लवकर शिक्षा द्यावी लागेल. मोहम्मद बिन सलमान यांच्याकडून या वक्तव्याची पाकिस्तानने कधीच अपेक्षा केली नसेल.

पाकिस्तानवर गेल्या अनेक वर्षांपासून दहशतवाद्यांना आश्रय दिल्याचा आरोप भारताने केला आहे. मात्र हे सर्व आरोप पाकिस्तानने नेहमीच फेटाळले आहेत. ओसामा बिन लादेनला अमेरिकी सैन्याने पाकिस्तानमध्ये जाऊन मारले. याशिवाय मुंबई हल्ल्यातील दोषींपर्यंत सगळ्यांनाच पाकिस्तानात आश्रय दिल्याचा आरोप आहे. याशिवाय सौदी अरेबियाच्या पाकिस्तानने अनेक दशके जिहादची फॅक्टरी चालवली आहे.

अंगणवाडी मदतनीससाठी उच्चशिक्षित महिलांचे अर्ज; इंजिनिअर्सचाही सहभाग

सुराज्य/नागपूर

सरकारी क्षेत्रात नोकरी मिळावी, असे स्वप्न उराशी बाळगणारे अनेकजण आहेत. त्यामुळे या क्षेत्रातील जागा निघताच त्यावर तुटून पडणाऱ्यांची संख्या भरपूर असते. अंगणवाडी केंद्रातील सेविकेच्या मदतीला मदतनिसाचे पद आहे. जिल्ह्यात २,२००च्या जवळपास अंगणवाड्या कार्यरत आहेत. गेल्या महिन्यात मदतनिसांच्या २८८ जागांची भरतीप्रक्रिया राबविण्यात आली. या पदासाठी एमएस्सी, एमएड, इंजिनीअर असलेल्या महिला उमेदवारांनी अर्ज केल्याची बाब छाननीअंती समोर आली.

एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत जिल्ह्यात २,२१२ अंगणवाड्या आहेत. येथे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील १ लाख ३४ हजार ३२५वर बालकांचे संगोपन केले जाते. त्यांना पोषण आहार, पूर्व प्राथमिक शिक्षण, आरोग्यविषयक नोंदी तसेच स्तनदा, गर्भवती, किशोरवयीन मुलींची काळजी घेतली जाते. याखेरीज शासनाचे लसीकरण, विविध आजाराच्या सर्वेक्षणातही अंगणवाडी केंद्राच्या सेविका, मदतनिसांचा महत्त्वपूर्ण सहभाग असतो.

जिल्ह्यातील २८८ केंद्रांत मदतनिसांची पदे रिक्त होती. त्यासाठी एकात्मिक बालविकास प्रकल्प कार्यालयाने भरती प्रक्रिया राबविली. मदतनीसपदासाठी बारावी पास पात्रता व स्थानिक महिला उमेदवारांना प्राधान्य देत तालुका बालविकास प्रकल्प कार्यालयाकडे अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले. एका जागेसाठी चार ते पाच अर्ज आले. यात उच्चशिक्षित महिला उमेदवारसुध्दा असल्याचे समोर आले.

मदतनिसांना केवळ साडेपाच हजार रुपये दरमहा तर सेविकांना १० हजार ३०० रुपये मानधन दिले जाते. सरकारी नोकरी म्हणून उच्चशिक्षितांची पसंती या पदाला मिळत असल्याचे या विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. यातील २७७ जागांवर नियुक्ती करण्यात आली. मात्र, ११ जागांवर तक्रारी प्राप्त झाल्यात. या तक्रारींच्या निराकरणानंतर या जागांचाही मार्ग मोकळा होणार आहे, अशी माहिती प्राप्त झाली.

कर्मचारी व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद वाढवा : पाठक

सुराज्य/मुंबई

''ज्याप्रमाणे अन्न, वस्त्र व निवारा या माणसाच्या मूलभूत गरजा आहेत. त्याप्रमाणे वीज ही अत्यावश्यक व मूलभूत गरज बनली आहे. या महत्त्वाच्या क्षेत्रात काम करताना मानव संसाधन व कामगार विभागाने सातत्याने कर्मचारी व कामगार संघटना यांच्यात सुसंवाद वाढविला पाहिजे'', असे मत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ सूत्रधारी कंपनीचे संचालक विश्वास पाठक यांनी व्यक्त केले.

महापारेषणच्यावतीने महानिर्मिती, महापारेषण व महावितरण या तिन्ही वीज कंपन्यांतील मानव संसाधन व कामगार विभागाच्या अधिकाऱ्यांची दोन दिवसीय सक्षमीकरण परिषद (मल्हार-२०२३) रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, भाईंदर येथे आयोजित केली आहे, त्या परिषदेत पाठक बोलत होते.

यावेळी महापारेषणचे संचालक (मानव संसाधन) सुगत गमरे, महावितरणचे संचालक (मानव संसाधन) अरविंद भादीकर, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) धनंजय सावळकर, महापारेषणचे मुख्य व्यवस्थापक (मा. सं.) सुधीर वानखेडे, महावितरणचे मुख्य महाव्यवस्थापक (मा. सं.) भूषण कुलकर्णी उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाव्यवस्थापक (मा. सं. मनुष्यबळ नियोजन) राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (मा. सं. आस्थापना) नितीन कांबळे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील, शिष्टाचार अधिकारी सतीश जाधव, जनसंपर्क अधिकारी डॉ. मिलिंद आवताडे यांच्यासह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन व आभार व्यवस्थापक (मा. सं.) महेश आंबेकर यांनी मानले.

...अन् मद्यधुंद जोडप्याचाच रंगला तमाशा

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील प्रकार

सुराज्य/पुणे



नाटकाचा प्रयोग सुरू आहे... नाटक ऐन रंगात येत आहे... कलाकारांच्या अभिनयाला प्रेक्षक दाद देत आहेत आणि अचानक त्यात मिठाचा खडा पडावा, असा प्रकार चाणक्य' या नाटकाच्या प्रयोगादरम्यान रविवारी रात्री घडला. कोथरूड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चाणक्य' या नाटकाच्या प्रयोगादरम्यान एका मद्यधुंद जोडप्याने भांडणे करून प्रेक्षागृहात प्रवेश केल्याने नाटकाच्या प्रयोगात व्यत्यय आला आणि सुमारे अर्धा तास हा तमाशा रंगला. या प्रकारामुळे नाट्यगृहातील सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित जोडप्याने मद्यपान केले होते. नाट्यगृहाच्या लॉबीत त्यांची भांडणे सुरू झाली. त्यातील महिलेने अचानकच नाटक थांबवा, नाटक थांबवा,' असे म्हणून प्रेक्षागृहात प्रवेश केला. प्रयोग सुरू असताना अचानकच आरडाओरडा सुरू झाल्याने प्रेक्षकांसह कलाकारही गडबडले. नेमका प्रकार लक्षात आल्यावर सर्वांनीच संबंधित जोडप्याला नाट्यगृहाबाहेर जाण्याची विनंती केली. मात्र, ते कुणाचेही ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते.

या प्रकाराबद्दल नाटकाचे दिग्दर्शक प्रणव जोशी म्हणाले, 'संबंधित जोडप्याचे वैयक्तिक भांडण नाट्यगृहात पोहोचले. जिथे प्रेक्षक आणि कलाकार आहेत, तिथे असा प्रकार घडूनही पालिकेची सुरक्षाव्यवस्था नसावी, याची खंत वाटते. मद्यधुंद जोडप्याने मारामारी आणि अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केली. प्रेक्षकांसह मी स्वतः त्या जोडप्याला विनंती करीत होतो, तुमच्याबरोबर लहान मूल आहे, त्याचा विचार करा, असे सांगतो होतो. मात्र, ते वेगळ्याच धुंदीत होते. प्रेक्षकांचा पाठिंबा असल्याने आणि नाटकाची टीम नेहमीच शो मस्ट गो ऑन' या वृत्तीने काम करीत असल्याने अखेर २०-२५ मिनिटांनी हा तमाशा संपल्यावर नाट्यप्रयोग पुन्हा सुरू झाला.'

'डाक' चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला

सोलापूर : 'डाक' या भयपटाचं चित्रीकरण पूर्ण झालं असून १३ ऑक्टोबरला हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.आजवर मराठीसह हिंदीतही महत्त्वपूर्ण भूमिका साकारत आपल्या अभिनयाचा ठसा उमटवण्यात यशस्वी झालेली मराठमोळी अभिनेत्री अश्विनी काळसेकर या चित्रपटात महत्त्वपूर्ण भूमिकेत दिसणार आहे.

महेश नेने प्रोडक्शनच्या बॅनरखाली रतिश तावडे आणि महेश नेने यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून देवांग गांधी यांचे 'डाक' चित्रपटाला विशेष सहकार्य लाभलं आहे. निर्मितीसोबतच या चित्रपटाचं दिग्दर्शनही महेश नेने यांनीच केलं आहे.

'फक्त मराठी सिने सन्मान' १५ सप्टेंबरला रंगणार

सोलापूर : फक्त मराठी सिने सन्मान २०२३ या पुरस्कार सोहळ्यासाठी उत्तमोत्तम चित्रपटांची निवड करण्यात आली आहे. नुकतीच पारितोषिकांसाठीची नामांकने जाहीर करण्यात आली आहेत. यंदाचे हे दुसरे वर्ष असून येत्या १५ सप्टेंबरला यंदाचा 'फक्त मराठी सिने सन्मान २०२३' सोहळा रंगणार आहे.

बाजारात वैविध्यपूर्ण गणेशमूर्ती दाखल; दर २५ टक्क्यांनी वाढले

गणेशभक्तांकडून जोरदार तयारी; सजावटीचे साहित्यही दाखल

सुराज्य/सोलापूर

लाखो भाविकांना प्रतीक्षा असलेला गणेशोत्सव अवघ्या ७ दिवसांवर येऊन ठेपला आहे. घरगुती तसेच सार्वजनिक मंडळे, मूर्तिकारांची लगबग सुरू झाली आहे. यंदा १९ सप्टेंबर रोजी गणरायाचे आगमन होणार आहे. त्यामुळे भाविकांकडून उत्सवाची जल्लोषात पूर्वतयारी होत आहे. साहित्यांच्या किमतीत वाढ झाल्याने मूर्तीच्या दरात २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाली आहे.

सोलापूर शहरात अनेक मूर्तीकार मूर्ती करतात. या मूर्तींना परराज्यातही मागणी असते. या मूर्तीकारांनी विविध, आकर्षण मोहक विविध रूपातील वस्त्र परिधान केलेल्या गणेश मूर्ती तयार केल्या असून त्या बाजारात विक्रीला आल्या आहेत. गणपतीच्या विविध रुपातील मराठमोळ्या रूपातील वस्त्र परिधान केलेल्या गणेश मूर्ती सद्या सर्वांचे आकर्षण ठरत आहेत. बाप्पाच्या मनमोहक मूर्ती शहरात दाखल झाल्या आहेत. मूर्ती बुक करण्यासाठी नागरिक बाजारपेठांमध्ये गर्दी करत आहेत. परिणामी, गणेशभक्तांना मूर्तींची भुरळ अधिक पडू लागली आहे. गणेश मुर्ती स्थापनेच्या ठिकाणी केली जाणारी सजावटची साहित्याचे स्टॉलही बाजारात सजले आहेत.

यात गणेशभक्तांच्या मागणीनुसार सुबक मुकुट, फेटे, धोतर, भरजरी पितांबर, हिरे, माणिक, मोतींच्या दागिन्यांची सजावट करून या मूर्ती तयार केल्या आहेत. त्यामुळे मूर्तींच्या किमती आकारानुसार हजारांच्या घरात आहेत. गणेशमूर्ती विक्रेत्यांनी बाजारपेठेत लालबागचा राजा, जय मल्हार, बाहुबली मूर्ती विक्रीस ठेवल्या आहेत. गणपती मंडळांकडून दगडूशेठ हलवाई व लालबाग मूर्तीला मागणी आहे.

घरगुती गणपती मूर्तीसह सार्वजनिक मंडळांसाठी लागणाऱ्या मोठ्या आकारातील गणेशमूर्ती विक्रीसाठी दाखल झाल्या आहेत. रेखीव डोळे, मूर्तीवरील इतर कोरीव काम असलेल्या मूर्ती घेण्याकडे गणेशभक्तांचा विशेष कल दिसून येतो आहे.

वाढीव किमतीचा परिणाम नाही

गणेशोत्सवाच्या स्वागतासाठी संपूर्ण शहर सजले असून यंदा गणेश मूर्तीसह सजावटीच्या साहित्यांच्या किमतीत मोठी वाढ असली तरी भक्तांच्या उत्साहावर त्याचा कोणताही परिणाम झालेला नाही. सर्व साहित्याचे दर वाढल्याने यंदा गणेशाच्या मूर्तीत २५ ते ३० टक्क्यांनी वाढ झाल्याचे विक्रेत्यांनी सांगितले. बाजारात साधारण ३०० रूपयांपासून मूर्ती विक्रीस आल्या आहेत. मोठ्या मंडळाच्या मूर्तीची किंमत लाखांच्या घरात आहे.

गणेश मंडळांची तयारी जोरात

यंदा गणेश मंडळाची तयारीही जोमात सुरु आहे. चौका-चौकात, जागो-जागी उभारण्यात येत असलेले मंडप लक्ष वेधून घेत आहेत. गेल्या १५ दिवसांपासून सर्व मंडळे लेझीम, ढोल ताशांचा सराव करताना दिसत आहेत. अनेक मोठ्या मंडळांनी गणेशोत्सवसमोर कोणते देखावे करायचे याचे नियोजन सुरू केले आहे. अनेक मंडळांनी पुणे आणि मुंबई, नाशिक येथील ढोल पथकाला मिरवणुकीसाठी पाचारण केले आहे.

महापालिकेकडूनही तयारी

महापालिकाही उत्सवाच्या तयारीला लागली आहे. पालिकेने परिमंडळांमध्ये निर्माल्य कलश व इतर सुविधांची तयारी सुरू केली आहे. पालिकेने पर्यावरणपूरक गणेशोत्सवावर भर देण्याचे आवाहन केले आहे. श्री गणेशाचे आगमन व विसर्जन मिरवणुकांना अडथळा येऊ नये यासाठी खड्डेमुक्त रस्ते करण्यासाठी पालिकेने कंबर कसली आहे. अनेकांच्या घरात एक, दीड दिवसांचा गणपतीही असतो, त्यासाठी पालिकेने अनेक ठिकाणी विसर्सन कुंडही तयार केले आहेत.

आकर्षक मूर्ती उपलब्ध

सोलापुरातील मधला मारुती, टिळक चौक, जोडबसवण्णा चौक,बाळीवेस,कौंतम चौक, सैफूल, हत्तुरे वस्ती आसरा, विडी घरकूल सह विविध ठिकाणी आकर्षक गणेशाच्या मूर्ती विक्रीस उपलब्ध आहेत. गणेश भक्तांनी आतपासूनच मूर्तींची बुकींग करण्यास सुरूवात केली आहे.

आकर्षक मूर्ती उपलब्ध

सोलापुरातील मधला मारुती, टिळक चौक, जोडबसवण्णा चौक,बाळीवेस,कौंतम चौक, सैफूल, हत्तुरे वस्ती आसरा, विडी घरकूल सह विविध ठिकाणी आकर्षक गणेशाच्या मूर्ती विक्रीस उपलब्ध आहेत. गणेश भक्तांनी आतपासूनच मूर्तींची बुकींग करण्यास सुरूवात केली आहे.

पुरस्काराबद्दल सुरेंद्र कांबळे यांचा वडजी येथे सत्कार

सोलापूर : वडजी (ता.द.सोलापूर) येथील आनंदराव देवकते माध्य.व उच्च माध्य.प्रशाला येथील ज्येष्ठ शिक्षक श्री सुरेंद्र नामदेव कांबळे यांना निर्भय प्रतिष्ठान मुंबई संस्थेच्या सोलापूर विभागाच्या वतीने सन २०२३ आदर्श शिक्षक गौरव पुरस्कार सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्या निमित्ताने प्रशालेच्या वतीने त्यांचा येथोचित सन्मान करण्यात आला.संस्थेचे मार्गदर्शक विश्वास गजबार, प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याण गजबार,शाळा विभाग प्रमुख श्रीमंत हक्के, शिक्षक, विद्यार्थांनी त्यांना पुढील शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार सांस्कृतिक प्रमुख आनंद भिमन्नवरु यांनी केले. श्रीमंत हाके यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,विद्यार्थी उपस्थित होते.

दलितवस्ती विकासासाठी ३ कोटी रूपये द्या; आ.रणजितसिंहांची मागणी

सोलापूर : माढा विधानसभा मतदारसंघातील ४० गावातील दलीतवस्ती विकासासाठी आ.रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे ३ कोटी रूपयांची मागणी केली आहे. माढा विधानसभा मतदार संघातील दलित वस्त्यांचा विकास व्हावा या उद्देशाने आ. रणजितसिंह मोहिते पाटील यांनी माढा मतदार संघातील सुमारे ४० गावातील दलीतवस्त्यांसाठी ३ कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली आहे. यावर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाही करून प्रस्तावित कामे मार्गी लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. मागणी करण्यात आलेल्या दलीतवस्ती मध्ये माळशिरस तालुक्यातील वायोली(२), माळखांबी, लवंग, बोरगांव, मिरे, नेवरे, जांबुड, वाफेगांव, खळवे, उंबरे(वे), विठ्ठलवाडी, माळवाडी (बो), बोरगाव (५) तर माढा तालुक्यातील टेंभुर्णी, परिते, चिंचोली, वडशिंगे, दारफळ सीना, अकोले खुर्द, आलेगाव बु, खैराव, बेंबळे पंढरपूर तालुक्यातील सुस्ते, नेमतवाडी, मेंढापूर, पटवर्धन कुरोली, अर्जुनसोंड, वाडीकुरोली, देवडे, कान्हापुरी, करकंब, भोसे, तुंगत या गावांचा समावेश आहे.

गोपाळपूर येथे पेटत्या लाकडाने मारहाण

सुराज्य/सोलापूर

चारित्र्याच्या संशयावरून चुलीतील पेटत्या लाकडाने पत्नीला मारहाण करण्यात आल्याची घटना गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथे सोमवारी सकाळच्या सुमारास घडली.

अश्विनी सोमनाथ बोंबाळे (वय २४ रा. गोपाळपूर) असे जखमी विवाहितेचे नाव आहे. तिने दिलेल्या फिर्यादीवरून तिचा पती सोमनाथ दगडू बोंबाळे यांच्याविरुद्ध पंढरपूर ग्रामीणच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला. चारित्र्याच्या संशयावरून आरोपीने तिला पेटत्या लाकडाने मारहाण करून जखमी केले . अशी नोंद पोलिसात झाली. हवालदार देशमुख पुढील तपास करीत आहेत.

मुडवी येथे मारहाणीत पिता-पुत्र जखमी

भावकितील शेतजमिनीच्या कारणावरून कोयता आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत पितापुत्र जखमी झाले. ही घटना मुडवी (ता.मंगळवेढा) येथे मंगळवारी सकाळच्या सुमारास घडली.

अमोल सुभाष शिवपुजे (वय २५) आणि त्याचे वडील सुभाष शिवपुजे (वय ५४ रा. मुडवी) अशी जखमी पिता -पुत्राची नावे आहेत. त्यांना मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. रवींद्र शिवपुजे याने मारहाण केली. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

अहमदअली शाहबाबा यांच्या ऊरुस निमित्त कार्यक्रम

सोलापूर : बाराईमाम चौक येथील सूफी संत हजरत पीर हाजी अहमदअली शाहबाबा यांच्या ऊरुस निमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. १७ ते २० सप्टेंबर पर्यंत या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती हाजी मकबुल मोहोळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. १७ रोजी सायंकाळी पाच वाजता संदल मिरवणुक निघणार आहे. १८ रोजी दुपारी ४ वाजता चिरागा कार्यक्रम, १९ रोजी जियारत कार्यक्रम आणि महाप्रसाद वाटप, २० रोजी सांयकाळी ७ वाजता महाप्रसाद वाटप करण्यात येणार आहे. २८ रोजी मिठाई वाटप, २९ रोजी सकाळी ६ वाजता बाराईमाम चौक युवक संघटना व बाराईमाम चौक ईद ए मिलादुन्नबी कमिटीच्या संयुक्त विद्यमाने बाराईमाम चौक येथे कव्वाल अनवर जानी, परवीन शहेजादी, कव्वाल अरमान ईफ्तेकारी यांच्या कव्वालीचा कार्यक्रम होणार आहे. हे कार्यक्रम बाराईमाम चौक येथील दर्गाह परिसरात होणार आहेत.

घरासमोरून चोरट्याने दुचाकी पळवली

सोलापूर : घरासमोर पार्क केलेली दुचाकी क्रमांक एमएच.१३.सीआर.०९९३ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना दि.१ ते २ सप्टेंबर दरम्यान न्यू पाच्छा पेठ अशोक चौक येथे घडली.

याप्रकरणी राजेंद्र मल्लय्या गाजूल (वय-४९, रा.न्यू पाच्छा पेठ) यांनी जेलरोड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरटाविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार धुमाळ हे करीत आहेत.

पंढरपुरातील दोन मोबाईल शॉपी फोडल्या

सोलापूर : शहरातील मोबाईल विक्रीची दोन दुकाने चोरांनी मंगळवारी पहाटे दोनच्या सुमारास फोडली तर आणखी एक मोबाईल दुकान फोडण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये अंदाजे तीन ते चार लाख रुपयांचे मोबाईल व मोबाईलचे इतर साहित्य चोरीला गेले आहे. शहरातील शहा पेट्रोल जवळील अनेक मोबाईल दुकाने आहेत. त्या ठिकाणची शाहरुख मणेरी (रा. तांबोळी वस्ती, देगाव, ता. पंढरपूर) एस एम मोबाईल शॉपी व महेश साळुंखे (रा. सेंट्रल नाका, पंढरपूर) या दुकानाचे शटर उचकटून चोरांनी आत प्रवेश केला आहे. एस.एम. मोबाईल शॉपीमधील अंदाजे २ लाख ५० हजार रुपये किंमतीचे मोबाईलचे नेहाले होते. तर विठ्ठई मोबाईल शॉपीमधील अंदांजे ५० हजार रुपये किंमतीचे मोबाईलचे साहित्य चोरून नेहले आहे. तर सोहम कांबळे (रा. पेहे, पंढरपूर) यांच्या सेल सेंटर मोबाईल शॉपी या दुकानात चोरीचा प्रयत्न झाला आहे. या दुकानात अंदाजे ४ ते ५ लाखाचा मोबाईल व इतर साहित्य होते. चोरांचा प्रयत्न अयशस्वी ठरला यामुळे सोहम कांबळे यांनी सुटकेचा श्वास घेतला आहे. पोलिसांनी घटना स्थळी भेट देऊन माहिती घेणे सुरू केले आहे. पंढरपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला असून गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अमलदार चोरांच्या शोधात त्यांच्या मागावर आहेत.

जिल्हा परिषदेसमोरील अतिक्रमण काढले

सुराज्य/सोलापूर

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने आज मंगळवारी जिल्हा परिषद परिसरातील अतिक्रमण काढण्यात आले. चार चाकी दोन गाड्या जप्त करण्यात आल्या.

महापालिका अतिक्रमण प्रतिबंधक विभागाच्या वतीने नियमितपणे शहरातील रस्त्यांवर रहदारीस अडथळा ठरणारे तसेच फुटपाथ वरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम सुरूच आहे. महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांच्या आदेशानुसार अतिरिक्त आयुक्त निखिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबविण्यात येत आहे. आज मंगळवारी दुपारी जिल्हा परिषद परिसरातील अतिक्रमण हटविण्यात आले. या परिसरातील रस्त्यावर रहदारीस अडथळा ठरणाऱ्या दाल चावलच्या २ गाड्या जप्त करण्यात आल्या तसेच एका कॅन्टींग लगत असलेले बांबूचे व कापडाचे शेड हटविण्यात आले. रस्त्यालगत असलेले अनधिकृत पत्रा शेडही जेसीबीच्या साह्याने निष्कासित करण्यात आले. सोलापूर शहरातील नागरिक व व्यापाऱ्यांनी स्वच्छ सोलापूर - सुंदर सोलापूर साठी आणि अतिक्रमण मुक्त सोलापूर करिता महापालिका प्रशासनास सहकार्य करावे. अतिक्रमण आढळून आल्यास जप्ती व फौजदारी कारवाई करण्यात येईल, असे आवाहन अतिक्रमण प्रतिबंधक विभागाचे प्रमुख जगन्नाथ बनसोडे यांनी केले आहे.

मुंडन करून जरांगे-पाटलांच्या आंदोलनाला पाठिंबा

सुराज्य/सोलापूर

सकल मराठा समाजाला कुणबी मराठा आरक्षण मिळावे, या मागणीसाठी जालना जिल्ह्यातील अंतरवाली-सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे-पाटील यांच्या समर्थनार्थ भोसे येथे उपोषणाला बसलेल्या उपोषणकर्त्यांना मुंडन करून पाठिंबा दिला. शिवाय विविध ग्रामपंचायतीने ठराव करून पाठिंबा दर्शविला आहे.

मनोज जरांगे-पाटील यांच्या उपोषणाला १४ दिवसांचा कालावधी लोटला तरी अद्याप आरक्षणाचा मार्ग मोकळा होत नसल्याने शासनाच्या धोरणाचा विविध स्तरातून संताप व्यक्त केला जात आहे. मनोज जरांगे-पाटील यांच्या लढ्याच्या समर्थनार्थ भोसे येथील उपोषणकर्त्यांना पुरुषोत्तम तळेकर, अमोल तळेकर, शहाजी कोरके, पांडुरंग सुरवसे, माउली कोरके, शिवाजी कोरके, पोपट सावंत, बबलू गायकवाड, राम कोरके, बुवा गावंधरे, प्रकाश आदमिले, महावीर घोडके, धनाजी चव्हाण आणि नीलेश कदम यांनी मुंडन करून समर्थन केले. भोसे येथील उपोषणकर्त्यांना करकंबचे ड. शरद पांढरे, संभाजी ब्रिगेडचे अमोल शेळके, ग्रा. पं. सदस्य विवेक शिंगटे, समाधान गुंड, तुषार खाडे यांच्यासह संभाजी ब्रिगेड, प्रहार संघटना, शिवशंभू संघटना, बार्डी, जाधववाडी, पांढरेवाडी, सुगाव-भोसे यांच्यासह माढा तालुक्यातील तंबावे आणि परिते ग्रामपंचायतीने ठराव करून पाठिंबा जाहीर केला आहे.

तरुणास मारहाण; रक्कम लुटली

सुराज्य/सोलापूर

किरकोळ कारणावरून तरुणास मारहाण करत त्याच्या खिशातील साडेआठ हजारांची रक्कम जबरदस्तीने काढून घेऊन दुचाकीवर पेट्रोल टाकून जाळून आर्थिक नुकसान केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ८ सप्टेंबर रोजी सायंकाळी जुना विजापूर नाका कंबर तलाव येथील एका कॉलेज जवळ घडली.याप्रकरणी गंगाधर रामचंद्र जेरबंडी (वय-२६,रा.२ नंबर झोपडपट्टी आम्रपाली चौक) याने सदर बझार पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्याच्या फिर्यादीवरून अप्पू मुंगळे,गुड्डू मुंगळे,अभि याच्यासह इतर तीन अनोळखी इसमानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

गंगाधर व त्याचा मित्र सिध्दार्थ मडीखंबे असे मिळून त्याच्या दुचाकीवर वरील ठिकाणी थांबले होते.त्यावेळी वरील संशयित आरोपी हे तेथे येऊन गंगाधर ला तू येथे का थांबला आहे ही आमची जागा आहे.असे म्हणत बांबूच्या काठीन मारहाण करून त्याच्या खिशातील रोख साडेआठ हजार जबरदस्तीने काढून घेतले तसेच त्याचा मित्र सिध्दार्थ याच्या दुचाकीवर पेट्रोल टाकून जाळून आर्थिक नुकसान केले.पुढील तपास पोसई लोंढे हे करीत आहेत.

चारित्र्याच्या संशयावरून पत्नीस मारहाण

चारित्र्यावर संशय घेत,लग्नात मानपाण केला नाही,महागडे वस्तू दिले नाही असे म्हणत विवाहितेला शारीरिक व मानसिक त्रास देऊन बेदम मारहाण केल्याप्रकरणी पतीसह तिघांवर विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना कोल्हापूर येथे घडली.याप्रकरणी निकहत नदाफ (वय-४३,रा.क्राऊन प्लाझा,आसरा चौक) यांनी फिर्याद दाखल केली आहे. पती एजाज मोहसिन नदाफ (वय-४३), सासू नजमा मोहद्दिन नदाफ (वय-६५,रा. दोघे रा. कोल्हापूर) व शमीम युसुफ दारुवाले (वय-४५,रा.फडके हौद,पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. तपास महिला पोलीस हवालदार भोसले या करीत आहेत.

संभाजी तलावातील मलनिस्सारण प्रकल्प गुंडाळला

३० नगरातून येते घाण; सुशोभिकरणाचा खर्च पाण्यात

सुराज्य/सोलापूर

सोलापूरचे फुफ्फुस म्हणून ओळखला जाणारा छत्रपती संभाजी तलाव घाणीच्या विळख्यात आहे. राष्ट्रीय तलाव संवर्धनाचा साडेसहा कोटींचा निधी पाण्यात गेला असून योजनेच्या मुळ उद्देशाला हरताळ फासला गेला आहे. आजही कुमठा नाका, अंत्रोळीकर नगर आणि जुळे सोलापूर परिसरातील ड्रेनेजचे पाणी तलावात मिसळत असल्याने तलावामधील पाण्याची दुर्गंधी कायम आहे.

विजापूर रस्त्यावरील छत्रपती संभाजी तलाव हा शहराच्या वैभवात भर घालणारा आहे. माजी खासदार शरद बनसोडे यांनी या तलावासाठी राष्ट्रीय तलाव संवर्धन योजनेंतर्गत साडेबारा कोटी रुपये मंजूर करून आणले होते. या तलावात परिसरातील सोसायट्यांमधील ड्रेनेजचे पाणी मिसळत होते. त्यामुळे तलावात मिसळणारे घाण पाणी बंद करून पाण्याचे शुद्धीकरण करणे आणि तलावातील जलपर्णी नाहीशी करणे हा या योजनेचा मुख्य उद्देश होता.

महापालिकेने तलाव सुशोभिकरणाचा १२ कोटींचा विकास आराखडा तयार करून केंद्र शासनाकडे पाठविला. त्या आराखड्यामध्ये एक एमएलडी क्षमतेच्या मलनिस्सारण प्रकल्पाचा समावेश होता. केंद्र शासनाकडून तलावाच्या सुशोभिकरणासाठी पहिल्या टप्प्यात साडेसहा कोटी २०१९ मध्ये महापालिकेला प्राप्त झाले.

दरम्यान, मागील तीन वर्षात या निधीतून तलाव परिसरात भरीव असे कोणतेही काम झाले नाही. केवळ तलाव बाजूचे कठडे, दिवाबत्ती, दोन कारंजे असे सुशोभिकरणाचे काम केले. विकास आराखड्यातील मलनिस्सारण प्रकल्पाला वगळण्यात आले. मलनिस्सारण प्रकल्प रद्द करून ड्रेनेज लाईनद्वारे संभाजी तलावात येणारे घाण पाणी थेट देगाव येथे प्रकल्पापर्यंत वाहून नेण्याची योजना आखण्यात आली. ड्रेनेजचे पाणी वाहून नेण्यासाठी अमृत योजनेंतर्गत ७५ लाख रुपये खर्चून पाइप लाइन टाकली. या पाइप लाइनच्या माध्यमातून तलावात मिसळणारे ड्रेनेजचे पाणी काही प्रमाणात कमी झाले. आजही कुमठा नाका, जुळे सोलापूर, आंत्रोळीकर नगरसह ३० नगराचे पाणी आजही तलावात मिसळते. त्यामुळे जलपर्णीचे मूळासकट उच्चाटन होत नाही. जलपर्णीसाठी वार्षिक मक्ता निश्चित करण्याची नामुष्की प्रशासनावर ओढावली आहे. त्यातच नव्याने टाकलेली ड्रेनेज लाइन फूटल्याने तलाव परिसरात सातत्याने घाण पाणी वाहणे सुरू आहे. याचा बंदोबस्त करणे प्रशासनाला जमले नाही.